म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा
दा. क्र. ४५३८.

मुलांचा मित्र

BVBK-0404537

दा. क्र. 8436
अनुक्रम
विषय
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

मुलांचा
मित्र

गं. रा. साने, बी. ए., बी. टी

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
ग्रा. क्र. ४५३८ नों. दि.
वि. बा. बा. क्र.

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव, मुंबई

BVBK-0404537

मूल्य चौदा आणे

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

पहिली आवृत्ति : १९५४

मुद्रक :
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक :
केशव भिकाजी ढवळे,
कर्नाटक हाउस,
चिराबाजार, मुंबई २

मुलांनो

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र... नों दि ....
वि. .... क्र.. . . ..

दररोज सकाळीं उठल्यापासून रात्रीं झोपीं जाईपर्यंत तुमच्या हातून ‘विद्यार्थी’ ह्या नात्यानें घरीं, दारीं, शाळेंत, अनेक तऱ्हेच्या चुका खाण्यापिण्यांत, वागण्यासवरण्यांत व अभ्यासादिकांत होत असतात. त्यांचें सविस्तर वर्णन करून त्या कामीं योग्य तो बोध व सूचना त्या त्या ठिकाणीं दिल्यास तुम्हांस आदर्श ‘विद्यार्थी’ बनण्याच्या कामीं मदत होईल असें वाटल्यावरूनच हा ‘मुलांचा मित्र’ मीं लिहिला आहे.

“जो गुण बाळा तो जन्मकाळा” ही म्हण तुम्हीं ऐकली असेलच. तेव्हां ह्या वयांतच तुम्ही ज्या सवयी लावून घ्याल त्याच पुढें कायम होणार. कारण स्वभाव हा अशा सवयींचाच बनलेला असतो. बिंदूंचाच सिंधु होतो व जें बिंदूंत तेंच सिंधूंत असणार, अर्थात् त्या बिंदूंचीच काळजी घेतल्यावर तो सिंधुही सुधासिंधु होईल.

गं. रा. साने

अनुक्रम

१. तुमच्या घरीं १
२. घरचा अभ्यास ... ७
३. स्नान, भोजन, विश्रांति व शालागमन १४
४. शाळेंत : १ ... २३
५. शाळेंत : २ ... ३१
६. परीक्षेच्या मंडपांत ... ४०
७. क्रीडांगणावर व घरीं ... ४६
८. इतर गोष्टी ... ४९

प्र क र ण प हि लें

तुमच्या घरीं

प्रथम तुमच्या अभ्यासाच्या खोलीचा विचार करूं. शक्य असेल त्या मुलांनीं स्वत:साठीं एक वेगळी अभ्यासाची खोली मिळेल अशी खटपट करावी. कारण इतर लहानमोठ्या माणसांच्या गडबडीच्या धबडग्यांत आधींच चंचल माकडाप्रमाणें चंचल असलेलें तुमचें मन अभ्यासाकडे नीट लागणें कठीण आहे. अभ्यासाला ह्याची किती जरूर आहे तें मी लवकरच सांगणार आहें. तरी अशा स्वतंत्र व वेगळ्या खोलीची खटपट करावी. पण गरीब कुटुंबांतील मुलांना हें शक्य नाहीं. तथापि, त्यांनीं निराश न होतां त्यांतल्या त्यांत, असेल त्याच राहाण्याच्या जागेंत स्वत:साठीं वेगळा कोपरा ठरवून घ्यावा. शक्य असेल तर टेबल व खुर्ची मिळाली तर अवश्य मिळवावी. कारण आळस न वाटतां बराच वेळ उत्साहानें अभ्यास करण्यास त्यांची मदत होते. गरीब मुलांना ह्या गोष्टी मिळणें कठीण असतें. तरीही त्यांनीं निराश न होतां '**निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु।**' हा थोरांचा मार्ग अनुसरावा. कारण '**क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे।**' ह्या वचनांत सांगितल्याप्रमाणें मोठ्यांचीं कार्यें त्यांच्या अंगच्या जोरावर घडून येतात, साधनांसाठीं ते अडून बसत नाहींत. लो. टिळक, आगरकर, गोखले,

देवधर, कर्वे, इत्यादि थोर लोकांच्या विद्यार्थीदशेचें, किंबहुना, त्यांच्या बौद्धिक जीवनाच्या अवघ्या आयुष्याचें रहस्य ह्यांतच सांठविलें आहे, असें तुम्हांस त्यांच्या चरित्रावरून कळून येईल. तरी वरील प्रकारचीं साधनें मिळालीं तर अवश्य घ्या पण नच मिळालीं तर त्यासाठीं रडत किंवा अडून बसूं नका. कसेंही करून आपल्या ध्येयावरची नजर ढळूं देऊं नका व मिळेल त्या साधनांनीं व असाल त्या स्थितींतूनच तें ध्येय गांठण्याचा यत्न करा. मी तुम्हांला जें ह्या पुस्तकांत सांगणार आहें तें गरीब मुलांच्याही आटोक्यांत असलेलेंच बहुतेक सांगणार आहें. पण त्या कामीं तुमची हयगय फार होते हीच माझी मुख्य तक्रार आहे. ह्यासाठीं ती तशी होऊं देऊं नका म्हणजे झालें.

मुलांनो, तुमच्या अभ्यासाच्या खोलीकडे अगर जागेकडे लक्ष दिल्यास काय दृष्टीस पडतें? कपडे, पुस्तकें अस्ताव्यस्त पडलीं आहेत, कोट एकीकडे तर टोपी दुसरीकडे भिरकावलेली आहे, वह्या इकडे तिकडे लोळताहेत, असाच देखावा दृष्टीस पडतो ना? आतां ह्या कामीं केवळ आळस हाच तुमच्या आड येत नाहीं काय? कारण, येथें गरिबी श्रीमंतीचा प्रश्न नसून आळशीपणा व उद्योगीपणा ह्यांचाच प्रश्न आहे.

आलस्य हें कार्य विघातकारी। असूं नये तो रिपु या शरीरीं॥
उद्योग सद्बंधु तया न टाकीं। त्या सेवितां पावसि मान लोकीं॥

असें कवि आपणांस सांगून गेले. पण आम्ही कशाला तिकडे लक्ष देतों आहोंत? आमचा आपला आळशीपणाचा व हलगर्जीपणाचा रामरगाडा चालूच आहे!

आळसें कार्य नासतें। हें तो प्रत्ययास येतें। कष्टांकडे चुकवितें। हीन जन॥

असें समर्थ म्हणतात, त्या 'हीन जना' चीच पदवी तुम्ही अखेरीस मिळविणार काय? नसाल तर कष्ट करण्यास कचरूं नका व आपल्या वस्तु जेथल्या तेथें व व्यवस्थित ठेवीत जा. कारण '**कष्टेंविण फळ नाहीं**' हा तर सिद्धान्तच आहे. मुलांनो, ज्या विद्यारूपी फळाची तुम्ही इच्छा करतां त्याला उद्योगाचें व कष्टाचें असें खतपाणी घातल्याशिवाय तो वृक्ष फळाफुलांनीं कसा बरें बहरेल? ह्यासाठीं, आळसाचें करंटपण सोडून देऊन, उद्योगाची श्रीमंती तुम्ही जवळ करा तरच तुमचें जीवन सुखाचें होईल.

पहिली गोष्ट पहाटे उठण्याची. मुलांनो, तुमच्यापैकीं पहाटे उठणाऱ्यांची संख्या फारच थोडी असते. बहुतेक मुलें 'सूर्यवंशी' असतात. पण हें ठीक नव्हे. कारण पहाटे उठण्यापासून आपणांस अनेक लाभ होतात. एक तर ही वेळ अत्यंत सात्त्विक व प्रसन्न असते. सर्व शरीर विश्रांति घेऊन ताजेंतवानें व तरतरीत झालेलें असतें. निसर्गाचा देखावाही मोठा रम्य व आल्हाददायक असतो. अर्थात् अशा वेळीं उठून शौचमुखमार्जन व शक्य तर स्नानसंध्यादि कृत्यें उरकून अंतर्बाह्य शुद्ध, स्वच्छ व पवित्रपणें अभ्यासाला बसल्यास किती बरें उल्हास वाटतो? तुम्ही कधीं पहाटे उठून पाहिलें असल्यास माझ्या म्हणण्याची सत्यता तुम्हांस पटल्याशिवाय राहाणार नाहीं! दुसरा फायदा म्हणजे ही वेळ शांत असल्यामुळें एकाग्रता होण्याला अत्यंत अनुकूल असते व त्याचप्रमाणें मेंदू तरतरीत असल्यामुळें पाठांतर होण्यासही हीच वेळ अनुकूल असते. ह्यासाठीं अत्यंत महत्त्वाचा व पाठांतराचा अभ्यास ह्या वेळीं उरकून घेतल्यास तें किती बरें फायदेशीर होणार आहे? पण येथेंही तो दुष्ट शत्रु जो आळस तोच आड येतो. पहाटेच्या साखरझोपेची गोड भुलभुलावणी तोच आपणांस देतो व त्याच्या आहारीं आपण गेल्यास '**आळसें राहिला विचार। आळसें राहिला आचार। आळसें नव्हे पाठांतर। कांहीं केल्या**' ह्या समर्थोक्तीप्रमाणें आपली स्थिति होते! पण ह्याच्याच उलट, '**लवकर निजे, लवकर उठे। तया ज्ञान, संपत्ति, आरोग्य भेटे॥**' किंवा,

> Early to bed and early to rise
> Makes a man healthy, wealthy and wise.

ह्या बिनमोल वचनांची आठवण ठेवून आपण त्या खोट्या आळशी सुखावर लाथ मारून झडझडून उठलों व वरीलप्रमाणें उद्योगास लागलों तर आपल्या सुखाला – सात्त्विक सुखाला – पारावार राहाणार नाहीं हें उघड नाहीं काय? ह्यासाठीं खोट्या सुखाला भुलूं नका व खऱ्या सुखाला आंचवूं नका.

मुलांनो, लक्षांत ठेवा कीं तुम्ही विद्यार्थी आहांत व 'विद्या' ही एक तपश्चर्या आहे, हें एक योगसाधन आहे. अर्थात् तिच्यापासून त्या तपश्चर्येचें सात्त्विक सुखच फक्त तुम्हांस मिळेल. इतर, जगाच्या राजस व तामस सुखाचा तुम्हांला त्यागच

करावा लागेल व असा त्याग केलात, तरच ती विद्या तुमच्या हातीं लागेल! ह्याच अर्थानें एका कवीनें जें म्हटलें आहे —

सुखार्थी त्यजते विद्यां विद्यार्थी त्यजते सुखम् ।
सुखार्थिनः कुतो विद्या, कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥

तें किती खरें आहे बरें?

पण ह्याप्रमाणें आपलें खाणें पिणें, वागणें सवरणें, जागणें झोपणें, ह्या कामीं जर आपण योग्य तें प्रमाण राखूं तर पारमार्थिक योगाप्रमाणेंच हा विद्यारूपी योगही तुमच्या अज्ञानादि दुःखांचा नाश करील हें निखालस समजा. कारण,

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥

असें भगवंतांचें वचनच आहे. तरी तें लक्षांत घेऊन त्याप्रमाणें चालू गोष्ट सांगावयाची म्हणजे पहाटे उठण्याचा आळस करूं नका.

ह्याप्रमाणें पहाटे उठायचें तर ठरलेंच व त्याप्रमाणें उठून वर म्हटल्याप्रमाणें शौचमुखमार्जनादि विधि उरकून मगच अभ्यासाला बसावें हें उचित आहे. कित्येक जण पहाटे उठल्यावर तसेच आंथरुणांत लोळत पडून अभ्यास करण्याचा यत्न करतात. पण त्यापेक्षां मीं वर सांगितलेला मार्ग अधिक सुखाचा व उल्हासाचा आहे हें अनुभव घेतल्यास तुम्हांस कळून येईल अशी माझी खात्री आहे.

ह्यानंतर प्रत्यक्ष अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी अजून दोन चार गोष्टी तुम्हांला सांगून मगच तुमच्या अभ्यासाकडे मी वळणार आहें.

मुलांनो, उठल्याबरोबर आपलें आंथरूण पांघरूण नीट गुंडाळून ठेवावें व आपली खोली अगर जागा नीट स्वच्छ झाडून, झटकून मगच शौचमुखमार्जनादि विधींनें आपलें शरीरही स्वच्छ करावें. अशा रीतीनें स्वच्छता पाळणें हें फार जरूर आहे. कारण 'Cleanliness is next to godliness' अशी इंग्रजी म्हणच आहे. दुसरें कारण म्हणजे ह्या स्वच्छतेनें मन सदैव प्रसन्न राहातें व '**मन करा रे प्रसन्न । सकल सिद्धीचें कारण ॥**' ह्या तुकोक्तीप्रमाणें आपल्या

 अभ्यासाच्या सिद्धीलाही तें साहाय्यकच होतें.

ह्याप्रमाणें अंतर्बाह्य शुद्ध व स्वच्छ होऊन अभ्यासाच्या जागीं येऊन बसल्यावर अभ्यासाला प्रारंभ करण्यापूर्वी त्या प्रसन्न मनानें गणपतीची भूपाळी व इतरही एखाद दुसरी भूपाळी किंवा प्रातःस्मरणीय अशा विभूतींचे श्लोक म्हणून त्यांना वंदन करावें. कारण, ही 'रामप्रहर' ची वेळ असते व '**प्रभाते. मनीं राम चिंतीत जावा**' असें त्या रामदासांचें आपणांस सांगणें आहे व तें योग्यच आहे. कारण, आपल्या अभ्यासादिकांत 'राम' त्यानेंच उत्पन्न होणार आहे! गणपति हा बुद्धिदाता आहे व 'ऋद्धिसिद्धींचा नायक' आहे तेव्हां आपणांस विद्येची सिद्धि प्राप्त होण्यास त्याचें स्मरण करणें जरूर आहे. शिवाय अशा रीतीनें भूपाळी व श्लोक म्हटल्यानें व क्षणभर आपल्या आवडत्या देवाचें भजन केल्यानें मनाला जी प्रसन्नता येते तिचेंही साह्य आपल्या अभ्यासाला होणार आहे. थोडक्यांत म्हणजे आपल्या अभ्यासाला साहाय्यक होणारी जी मनःप्रसन्नता ती ज्या ज्या उपायानें साधेल ते ते सहजसाध्य उपाय आपण केले पाहिजेत.

ह्या प्रसन्नतेबरोबरच आपल्या मनांत उदात्त भावना व उच्च महत्त्वाकांक्षा ह्यांच्या लाटा सदैव हेलावत राहाव्यात ह्यासाठीं तिसरी गोष्ट म्हणजे आपल्या बैठकीच्या जागीं राम, कृष्ण, हनुमानादि पौराणिक, शिवाजी, बाजीसारख्या ऐतिहासिक व टिळक, आगरकर, गोखले, रानडे ह्यांसारख्या आधुनिक थोर पुढाऱ्यांचे व रामदास, तुकारामांसारख्या साधुसंतांचे फोटो ऊर्फ छायाचित्रें लावलेलीं असावींत, म्हणजे त्यांच्या दर्शनानें मन उच्च भावनांनीं व सात्त्विक महत्त्वाकांक्षेनें भरून जातें. कारण, कै. ह. ना. आपटे ह्यांनीं आपल्या 'जीवितमहिमा' ह्या पद्यांत म्हटल्याप्रमाणें

थोर महात्मे होउनि गेले चरित्र त्यांचें पहा जरा।
आपण त्यांच्या समान व्हावें, हाच सांपडे बोध खरा॥

अर्थात् हा बोध त्यांच्या छायाचित्रदर्शनानेंही होऊन आपलें मन उच्च विचारांनीं भरून जाईल ह्यांत शंका नाहीं. तेव्हां अशीं चित्रें अवश्य आपल्या अभ्यासाच्या जागीं लावावींत व त्यांनाही परमेश्वराप्रमाणेंच आपण वंदन करून त्यांचाही आशीर्वाद आपल्या कामांत यश देण्यासाठीं मागावा. पण त्याचबरोबर 'God helps those who help themselves' किंवा 'प्रयत्नांतीं परमेश्वर' ह्या म्हणी आपण विसरतां कामा नये. आळस, अज्ञानादि चिखलांत रुतलेला आपल्या

देहाचा व बुद्धीचा गाडा चालता करण्यासाठीं, त्या गाड्याला त्या चिखलांतून बाहेर काढण्यासाठीं, त्याच्या चाकाला आपण स्वतः खांदा लावला पाहिजे व स्वतःच्या प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे, तरच तो परमेश्वर आपल्या मदतीस धावेल. तेव्हां हें लक्षांत ठेवून त्या कामीं आपण आतां उद्योगाला लागूं या.

शेवटची गोष्ट अर्थात् तो उद्योग व्यवस्थित व्हावा म्हणून आपल्या बैठकीच्या जागीं शाळेच्या तासांचें जसें वेळापत्रक लावलेलें असावें तसेंच आपलें स्वतःचें घरचें रोजच्या व सुटीच्या दिवसाचेंही अभ्यासादिकांचें वेळापत्रक लावलेलें असावें व त्याबरहुकूम आपण शक्य तों वागणूक ठेवावी म्हणजे आपला अभ्यास सुव्यवस्थित होऊन कोणत्याही तऱ्हेची गडबड किंवा धांदल होणार नाहीं. चला तर, आतां आपण तुमच्या अभ्यासाकडे वळूं.

प्रकरण दुसरें

घरचा अभ्यास

मुलांनो, साधारणपणें घरोघरीं कशा प्रकारें अभ्यास चालतो ह्याचें जर आपण अवलोकन केलें तर कै. राम गणेश गडकऱ्यांनीं 'सकाळचा अभ्यास' म्हणून जो विनोदी प्रवेश लिहिला आहे त्याचेंच चित्र आपणांस दृष्टीस पडणार आहे व कै. गडकऱ्यांनाही ह्या विनोदी प्रवेशाच्या रूपानें तुम्हांला हाच बिनमोल उपदेश करावयाचा आहे कीं अभ्यासाच्या वेळीं चित्त एकाग्र करा व खरा खरा मन लावून अभ्यास करा, नाहींतर त्या अभ्यासाचा 'अभ्यासा'च्या नांवाखालीं केवळ खेळखंडोबा होऊन जातो. मुलांनो! एकाग्र मनानें तपश्चर्या करणाऱ्या एका साधु पुरुषाच्या शेजारून मोठी मिरवणूक वाजत गाजत गेली, पण त्या साधूची एकाग्रता तिळमात्रही विचलित झाली नाहीं अशी गोष्ट सांगतात ती किती बोधप्रद आहे बरें? तुमचा अभ्यास म्हणजेही एक तपश्चर्या आहे, योगसाधन आहे हें मीं मागें सांगितलेंच आहे व तपश्चर्येला, योगसाधनाला ह्या एकाग्रतेची किती आवश्यकता असते हें आपल्या कथा-पुराणांतून मोठमोठ्या तपस्व्यांच्या व योग्यांच्या आणि साधूंच्या ज्या कथा लिहिल्या आहेत त्यांवरून तुमच्या लक्षांत येईलच. त्या तपश्चर्येचा भंग झाला असतां मनुष्य आपल्या ध्येयापासून च्युत होतो, तें ध्येय

त्याच्यापासून दुरावतें व प्रसंगीं त्यास सोडूनही जातें अशाही गोष्टी तुम्हीं वाचल्या असतील, त्यांवरूनही ही तपश्चर्या, हें 'विद्यासाधन' आपण किती एकनिष्ठपणें व दृढनिश्चयानें केलें पाहिजे व त्याला मुख्य साधन जी एकाग्रता ती कशी साधली पाहिजे हेंच दिसून येत नाहीं काय? कारण, एकदा हें चंचल मन — माकडाप्रमाणें उड्या मारणारें व नाना चेष्टा आपल्या इंद्रियांच्या द्वारें करणारें हें मन — निश्चल झालें कीं मग —

मन हें निश्चल झालें एका ठायीं। तया उणें काई निजसुखा॥

ह्या तुकोक्तीप्रमाणें सर्व सुखें आपल्या स्वाधीन होतात, अर्थात् मग अभ्यासाचेंही सुख आपल्या पदरीं पडेल. ह्या मनाचें सामर्थ्य अपार आहे, ह्याची योग्यता फार थोर आहे. नरकाच्या खोल दरींत नेऊन बुडविणारें व उलट परमेश्वराच्या दिव्य पायांपर्यंत नेऊन भिडविणारें हें आपलें मनच आहे. पण तें फार चंचल आहे व म्हणून हळूहळू प्रयत्नानें त्यास आपल्या ताब्यांत घ्या व एखाद्या खंद्या घोड्यावर बसणाऱ्या बारगिराप्रमाणें त्यावर मांड टाकून आपल्या अभ्यासाची घोडदौड सुरू करा.

मुलांनो, 'एकाग्रतेचें फळ' हा धडा कदाचित् तुमच्या वाचण्यांत आलाच असेल. त्यांतही कौरवपांडवांची नेमबाजीची परीक्षा गुरु द्रोणांनीं कशी घेतली व वृक्षावरील भास पक्ष्याचें डोकें अचूक उडविण्याच्या कामी कमालीची एकाग्रता साधण्यांत अर्जुनच कसा शेवटीं यशस्वी ठरला तें सांगून त्या लेखकांनीं हाच उपदेश केला आहे कीं मुलांनो, तुम्हांलाही तुमच्या कार्यांत यश यावें अशी इच्छा असेल तर अशी पूर्ण एकाग्रता साधा म्हणजे तें यश तुम्हांला मिळाल्याशिवाय खास राहाणार नाहीं. ह्यासाठीं तसा प्रयत्न अवश्य करा.

वर म्हटल्याप्रमाणें बहुतेक मुलांच्या अभ्यासाचा, 'अभ्यासाच्या' नांवाखालीं निव्वळ खेळखंडोबा होतो, ह्याचें कारण ते अभ्यासाच्या वेळीं खेळतात, दुर्लक्ष करतात, हेंच होय! ह्यासाठीं तसा खेळखंडोबा होऊं नये असें वाटत असल्यास —

Work while you work and play while you play,
That is the way to be happy I say.

हें बिनमोल आंग्लवचन त्यांनीं लक्षांत ठेवावें. कारण त्यांत म्हटल्याप्रमाणें 'अभ्यासाच्या वेळीं अभ्यास व खेळाच्या वेळीं खेळ' हाच सुखाचा सुगमोपाय आहे हें प्रत्येक मुलानें लक्षांत ठेवावें व एकाग्र चित्तानें अभ्यास करावा ह्यांतच त्याचें कल्याण आहे! "**शुचौदेशे प्रतिष्ठाप्य स्थिरमानसनमात्मनः**" व "**तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः**" ह्या ओळींत योगसाधनाबद्दल भगवंतांनीं हेंच सांगितलें आहे व 'अभ्यास' हें योगसाधन आहे हें आपणांस ठाऊकच आहे. दुर्लक्ष करून केलेल्या दहा तासांच्या अभ्यासापेक्षां नीट लक्षपूर्वक केलेला तासभराचा अभ्यासही श्रेष्ठ ठरतो, हें तुमच्याही प्रत्ययाला आलें असेलच. जीं आळशी, लबाड व बेपर्वा मुलें असतात, जीं केवळ खेळण्याच्या व तेंही भलत्या वेळीं खेळण्याच्या खोट्या सुखाला लालचावलेलीं असतात, तींच वरील नियमांकडे दुर्लक्ष करून आपली व पालकांची वंचना करूं पाहातात. पण पुढें त्यांना पश्चात्तापाची पाळी येते. पण 'पश्चात् तापच' तो! त्याचा मग काय उपयोग? ह्यासाठीं वेळींच सावध व्हा व विद्येच्या सुखाचा वर दिलेला जो एकच मार्ग, एकच उपाय म्हणजे एकाग्रता साधून 'जेव्हांचें काम तेव्हां' करणें, दुसरें त्या वेळीं न करणें, तो तुम्ही अनुसरा तरच तुम्हांस ह्या विद्येचें खरेंखरें सुख प्राप्त होईल. आतां आपण तुमच्या घरच्या अभ्यासाचा तपशीलवार विचार करूं.

ह्या अभ्यासांत इंग्रजी, मराठी, संस्कृत, इतिहास, भूगोल, गणित व शास्त्रें (सायन्स) असे निरनिराळे विषय असतात. ह्या विषयांच्या अभ्यासांत पाठांतराचें व मननपूर्वक वाचन करून लक्षांत ठेवण्याचें काम पहाटेच्या वेळांत उरकून घ्यावें, कारण पहाटेची शांत, प्रसन्न व तरतरीत वेळ त्याला फार अनुकूल असते.

त्यानंतरच्या अभ्यासाचा भाग म्हणजे वरील विविध विषयांपैकीं इंग्रजी, मराठी, संस्कृत, गृहपाठ, निबंध, शब्दार्थ, उदाहरणें व इतिहास-भूगोलाची माहिती वह्यांतून लिहून आणण्यास तसेंच इंग्रजी व मराठी कित्ते वह्या लिहून आणण्यास तुम्हांस तुमच्या शिक्षकांनीं सांगितलेलें असतें तो. अर्थात् सर्व विषयांची एकदम गर्दी सहसा कधींच नसते. तर प्रत्येक दिवशीं त्या त्या तासाप्रमाणेंच जसें तोंडी वाचन, पाठांतर, वगैरे तयार करून न्यावयाचें असतें तसेंच लेखनाचें कामही त्या त्या तासाप्रमाणेंच घरून करून न्यावयाचें असतें. पैकीं तोंडीं काम पहाटेच्या प्रहरीं

उरकून घ्यावें. त्यानंतर लेखनाचें काम करावें. ह्या लेखनाच्या कामाकडे वळल्यास आपणांस काय दृष्टीस पडतें ? बहुतेक मुलें तें काम निव्वळ ' बिगार टाळायची ' ह्या वृत्तीनें अगदीं वेठीस धरल्यासारखें कसेंबसें व फार हलगर्जीपणानें करतात असेंच आपणांस दिसत नाहीं काय ? तें कसें तें आतां तपशीलवारच मी तुम्हांला सांगतों.

प्रथम वहीचें मलपृष्ठच घ्या. त्यावर जी माहिती म्हणजे विद्यार्थ्याचें नांव, यत्ता, तुकडी, विषय, इत्यादि सदरें भरावयाचीं असतात तीं सर्व नीट भरलेलीं तुम्हांला क्वचित्‌च दिसतील. कांहीं दिवस ह्याप्रमाणें वापरल्यावर त्यावर पडणाऱ्या शाईच्या, अगर तेलाच्या डागाकडेही दुर्लक्ष करून दुसरें कव्हर न घालतां तशाच वह्या देणारींही कांहीं मुलें निघतात! अर्थात्‌ ह्या सर्व गोष्टी वाईट असून त्यांचा त्यागच करावयास पाहिजे हें वेगळें सांगणें नकोच. कारण, " तैलाद्रक्षेत्‌ जलाद्रक्षेत्‌ रक्षेत्‌ शिथिलबंधनात्‌ " अशी प्रार्थना पुस्तकें, ग्रंथ ह्यांच्याप्रमाणेंच वह्याही करीत असतात. पण त्याकडे दुर्लक्ष करणारेही विद्यार्थी निघतात.

आतां वहीच्या आंतमध्यें पाहूं या. पहिलें पान ' अनुक्रमणिके 'साठीं असतें. ती पूर्ण व वेळच्यावेळीं भरण्याची खबरदारी घेण्यांतही कित्येकांची हयगय होते. नंतर खुद्द जो गृहपाठ, निबंध, वगैरे जें कांहीं लिहावयाचें त्यासाठीं योग्य तो समास कित्येकजण (घरीं बनविलेल्या वहीवर) सोडीत नाहींत. तसेंच समासांत त्या निबंधाचा, गृहपाठाचा, वगैरे क्रमांक घालणें, ज्या दिवशीं तें लेखन विद्यार्थ्यानें केलें असेल ती तारीख (तारीख, महिना व सन) घालणें, जें लेखन केलें त्याला मथळा असल्यास तो योग्य जागीं लिहिणें, ह्या प्रत्येक बाबतींत चुका करणारीं कितीतरी मुलें आढळतात. विशेषतः तारीख लिहिण्याची हयगय करणारीं मुलें तर कितीतरी असतात! घरोघर इतकीं कॅलेंडरें फडकत असून बापड्या मुलांना जणों त्यांचा पत्ताच नसतो! बरें, वरील सर्व चुका एकएकदाच होऊन सुधारणारे विद्यार्थीही थोडेच. अनेकदा व पुनःपुन्हा त्याच त्या चुका करीत राहाणारे विद्यार्थीच फार! हा निव्वळ आळस किंवा बिगारीची वेठ उचलण्याचाच प्रकार नव्हे काय ?

ह्यानंतर कव्हरप्रमाणेंच आंतही डाग पाडणारे कित्येकजण निघतात, ही गोष्ट त्यांचा निष्काळजीपणाच दाखविते, हें उघड आहे. आतां खुद्द मुलांच्या

हस्ताक्षराकडे वळल्यास आपणांस काय दिसतें? सुंदर, सुवाच्य हस्ताक्षरानें लिहिणारीं मुलें थोडीं व कशीतरी बिगारीची वेठ उठविणारीं मुलेंच फार, असाच देखावा घरोघर दृष्टीस पडतो ना? वास्तविक गृहपाठाच्या वह्या ह्या शाळेच्या वार्षिक तपासणीच्या वेळीं दिपोटींना दाखविण्यासाठीं व त्यांजकडून उत्तम शेरा मिळवून घेण्यासाठीं म्हणून असतात ना? अर्थात् त्याचा तरी मूळ हेतु मुलांचें लेखन उत्तम रीतीनें सुधारावें हाच असतो. पण स्वतःच्या उत्कर्षाची व शाळेच्या नांवाची पर्वा ह्यां बेपर्वा मुलांना असेल तर ना? मुलांनो, ह्यामध्यें आपण काय साधतों बरें? केवळ आळस, चुकारतट्टूपणा ह्याच गोष्टी साधतों ना? दुर्लक्ष, बेपर्वाई, आळस व वेठबिगार मारून नेण्याची वृत्ति आणि स्वतःच्या, स्वतःच्या कुळाच्या व स्वतःच्या शाळेच्या नांवलौकिकाविषयीं महत्त्वाकांक्षा नसणें ह्या गोष्टी चांगल्या का आहेत? उलट त्या आपल्या शत्रुच आहेत. अक्षर किरटें, बारीक, मुंग्यांसारखें लहान व धड वाचतांसुद्धा न येईल असें आणि दाटीवाटीनें न काढतां

वाटोळें, सरळ मोकळें । ओतलें मसीचें काळें ।
कुळकुळीत चालिल्या ढाळें । मुक्तामाळा जैशा !॥

ह्या ओवींत समर्थांनीं वर्णिल्याप्रमाणें मोत्यांच्या अ[illegible]शीं स्पर्धा करण्यास धजणारें असें अक्षर काढण्याचें ध्येय तुम्ही आपल्या समोर ठेवा. नाहींतर स्वतःचें लेखन दुसऱ्याला तर राहोच, पण स्वतःलाही परत वाचतां येत नाहीं, 'स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ।' अशा तऱ्हेचें अक्षर काढणारींही कांहीं मुलें निघतात. तरी त्यांनीं ह्यापासून योग्य तो बोध घ्यावा.

लेखनाच्या बाह्यांगांतील अजून दोन गोष्टी सांगून मग मी अंतरंगाकडे वळणार आहें. त्या दोन गोष्टी म्हणजे कागद व शाई! कित्येकांचे कागद फुटकेच असतात, अर्थात् त्यांचें नशीबही मग फुटकेंच निघावें, त्यांना मार्क नीट मिळूं नयेत हेंच योग्य नव्हे काय? त्याचप्रमाणें कित्येक मुलें शाई इतकी फिकी वापरतात कीं 'त्यापेक्षां पाणी बरें' असें अतिशयोक्तीच्या विनोदानें म्हणतां येईल! तर सांगण्याचा उद्देश इतकाच कीं कागद धडका, न फुटणारा, असा असावा. हाताच्या सर्दीनें फुटत असल्यास हाताखालीं टीपकागद धरावा व शाईही निळी, काळी, किंवा जांभळी अशी गडद असावी म्हणजे तें लेखन ठीक येण्यास मदत होते.

हें सगळें बाह्यांग असलें तरी त्याचें महत्त्व कमी नव्हे. कारण कोणाही व्यक्तीसंबंधीं प्रथमदर्शनीं पहिल्याच दृष्टिनिक्षेपांत आपलें चित्त आकर्षून घेईल असें तिचें रूप व कपड्यालत्त्यांचा रुबाब असल्यास तो वावगा म्हणतां येईल काय? एखाद्या ओंगळवाण्या व घाणेरड्या मनुष्याशीं आपणांस बोलावेंसें तरी वाटतें का? ह्याचा ज्याचा त्यानेंच आपल्या मनाशीं विचार करावा म्हणजे आपलें अक्षर, कागद, शाई, वगैरे बाह्यांग चांगलें कां हवें, ह्याचा त्यास सहजच उलगडा होईल!

पण "गोरा गोमटा अन् कपाळकरंटा!" ह्या म्हणीप्रमाणें सुंदर अक्षराचीं पण अशुद्ध लेखनाचीं अशींही कांहीं मुलें असतात. अक्षरही नीट नाहीं व शुद्धलेखनही वाईट आहे अशीं तर कितीतरीं मुलें असतात. अक्षर उत्तम नसलें तरी बऱ्यापैकीं असणारीं बरींच मुलें घेतलीं तरी त्यांतही शुद्धलेखनास जपणारीं फारच थोडीं मुलें दृष्टीस पडतात! पण हा सर्व जसा अज्ञानाचा तसाच आळशीपणा, बेपर्वाई व कशीबशी बिगार टाळण्याच्या वृत्तीचाच परिणाम होय. कारण एकच शब्द एके ठिकाणीं शुद्ध व एके ठिकाणीं अशुद्ध लिहिणारास तुम्ही काय म्हणाल बरें! आतां ह्या शुद्धलेखनाच्या अंतरंगाकडे वळूंया.

मुलांनो, बाह्यांगापेक्षां अंतरंग हेंच केव्हांही श्रेष्ठ आहे हें विसरूं नका. आतां बाह्यांगही चांगलें कां हवें तें मीं वर सांगितलेंच आहे. कारण आपणास मिळणाऱ्या मार्कांत व आपणासंबंधीं शिक्षकांच्या व परीक्षकांच्या होणाऱ्या ग्रहांत त्यानें अनुकूलता उत्पन्न होऊन एखादद्सरा मार्क सहजच त्यानें जास्त मिळून जाण्याचा संभव असतो हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. पण इतकें केलें तरी अंतरंग म्हणजे शुद्धलेखन जर वाईट असेल तर त्या सर्वांवर पाणी पडतें. त्यावर आपण आपल्या हातानें बोळा फिरविल्यासारखें होतें! ह्यासाठीं ह्या अंतरंगास आपण जपलें पाहिजे, शुद्धलेखनाची नीट काळजी घेतली पाहिजे.

ह्या कामीं आळस, हलगरज, वगैरे शत्रूंची हकालपट्टी आपण तत्काळ केली पाहिजे. तशी करूनही कित्येकांचें लेखन जें अशुद्ध येतें त्याला कारण त्या कामीं ऱ्हस्व, दीर्घ, अनुस्वार, विसर्ग व शुद्ध रूप ह्यांचें अज्ञान हेंच कारण असतें व
 त्यासाठीं – म्हणजे तें अज्ञान दूर व्हावें ह्यासाठीं – वरील बाबतींत जे शुद्धलेखनाचे

नियम आहेत त्यांची ओळख तुमचे शिक्षक तुम्हांस करून देतील तेव्हां त्याकडे दुर्लक्ष करूं नका व ते नियम पूर्ण लक्षांत ठेवून त्याप्रमाणें लेखन केल्यास तुमच्या हातून ह्या अंतरंगाचा उठावही सुंदर होईल व मार्कही भरपूर मिळत जातील हें लक्षांत ठेवा.

हलगर्जीपणाच्या चुकांत काना, मात्रा, वेलांटी, पूर्णविराम, प्रश्नचिन्ह, अवतरणचिन्हें देण्यास विसरणें, इत्यादि चुका येतात व त्या लिहिलेलें लक्षपूर्वक पुन्हा वाचून टाळतां येणें शक्य आहे. तरी त्या अवश्य टाळाव्या! आणखी एक विचित्र चूक सांगायची म्हणजे मराठी लेखनांत ओळीच्या शेवटीं पूर्ण लिहिलेल्या शब्दाच्या पुढेंही, जणूं काय तो शब्द अपूर्णच आहे, अशा थाटांत दिलेल्या आडव्या रेघेची होय! कित्येक मुलांच्या वहीवर ही चूक पुष्कळ ओळींच्या शेवटीं सापडते. शब्द अपूर्ण असेल तरच अशी रेघ देण्याची पद्धत आहे. तरी अशा निष्कारण आडव्या रेघा देऊन वाचतांना अडथळा उत्पन्न करण्याचें तुम्हांला कांहींच कारण नाहीं.

इंग्रजी लेखनांत ओळीच्या शेवटीं वर्ण तोडून लिहिण्याची सहसा पद्धत नाहीं. तरी त्या फंदांत निदान लहान मुलांनीं तरी पडूं नये. तसेंच लहान व मोठीं (कॅपिटल) अक्षरें काढण्याचे नियमही विसरूं नयेत. कोणत्याही लेखनांत शब्दांतलीं अक्षरें जरी जवळ जवळ काढलेलीं असलीं तरी शब्दांची खेटाखेट कामाची नाहीं. दाटीवाटीनें लिहिणें अत्यंत वाईट, हें लक्षांत ठेवून प्रत्येक दोन शब्दांत, तसेंच प्रत्येक दोन ओळींतही (अर्थात् बिनआखलेल्या वहींत) योग्य अंतर ठेवून मगच लिहावें. म्हणजे वाचणाराला बरें वाटतें व तपासणारालाही चुकांची दुरुस्ती नीट दाखवितां येते.

ह्याशिवाय आपलें लेखन मुद्देसूद असावें हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे. पण घरच्या लेखनांत ह्याची सूचना देण्याची फारशी जरूर पडत नाहीं. कारण जरूर तेव्हां पुस्तकें अगर मुद्दे आपल्या हाताशींच असतात व त्यांत पाहून आपण नीट लिहूं शकतों. ह्यासाठीं ह्या मुद्द्याचा विचार तुमच्या परीक्षेच्या संबंधीं लिहितांना जास्त करूं. आतां तुमच्या भोजनादिकासाठीं मी तुम्हांस घेऊन जातों, चला. कारण ठण् ठण् ठण् ठण् असे घड्याळाचे दहा टोले कोठूनसे ऐकूं आले! चला तर. [१३

प्र क र ण ति स रें

स्नान, भोजन, विश्रांति व शालागमन

मुलांनो, तुम्हांला मीं दहा वाजतां भोजनासाठीं चला म्हणून उठवलें तें अर्थात् तुमचें स्नानसंध्यादि नित्यकर्म पहाटे झालें आहे असें गृहीत धरूनच उठवलें आहे हें उघड आहे व ह्याप्रमाणें तें पहाटे होण्यांतच कसे फायदे आहेत हेंही मीं मागें दाखविलेंच आहे. पण पहाटेचें स्नान करणें सोसत नसल्यास व भोजनाच्या आधीं करण्याची सवय असल्यास मात्र ९ – ९॥ लाच तुम्हांस उठलें पाहिजे व तें सर्व काम नीट केलें पाहिजे. अर्थात् भोजनाला बसण्याच्या आधीं ह्या स्नानादिकांबद्दल दोन शब्द सांगून मगच आपण भोजनास बसूं या.

कित्येक मुलें कावळ्यासारखें स्नान करतात. म्हणजे कसेबसे दोन तांबे डोक्यावर ओतून भोजनासाठीं धावत सुटतात. पण अशा धांदरट करणीनें बिचाऱ्यांचें सर्व अंगसुद्धा नीट भिजत नाहीं; मग तें नीट घासून, चोळून स्नान करणें दूरच राहिलें. ह्यासाठीं असें करूं नका. कारण, मुलांनो, आपल्या शरीरांतून घामाच्या रूपानें कळत नकळत जी घाण आपल्या शरीरावाटे बाहेर टाकण्याचें काम निसर्ग करीत असतो ती आपल्या शरीराच्या अनेक रंध्रांच्या द्वारेंच तो करतो हें उघड आहे.
 अशीं रंध्रें प्रत्येक रोमरोमागणिक असतात, अर्थात् अनंत असतात, अगणित

असतात. तेव्हां आपलें डोकें, हात पाय, तोंड, पाठ, पोट, इत्यादि सर्व अवयव नीट चोळून घासून ती सर्व घाण शुद्ध पाण्यानें धुवून टाकली तरच आपलीं सर्व छिद्रें मोकळीं होऊन त्यांतून शुद्ध हवा खेळूं लागेल व आपणांसही किती तरी हलकें व प्रसन्न वाटेल.

स्नान करतांना कित्येक मुलांना उगीच तांब्यातांब्या पाणी अंगावर ओतून खेळत बसायची व वेळ गमावण्याची सवय असते. पण हेंही कामाचें नाहीं. कारण 'रात्र थोडी आणि सोंगें फार' ह्याप्रमाणें आपणांस खऱ्या रीतीनें पाहातां वेळ थोडा व कामें पुष्कळ असतात व तीं व्यवस्थित व्हायला हवीं असतात. मग असें गमून कसें चालेल बरें? तेव्हां असा वेळ फुकट न घालवितां पण त्याजबरोबर, आपण एखादा तांब्या अगर भांडें जसें मातीनें नीट घासून, चोळून स्वच्छ धुतों त्याप्रमाणें शक्यतर साबण लावून व तो नच मिळाल्यास नुसत्या हातानेंही आपलें सर्वांग नीट चोळू घासून स्नान करावें व शरीर लख्ख करावें हें मीं वर सांगितलेंच आहे.

ह्याप्रमाणें आंघोळ केल्याबरोबर शरीराभोंवतीं अंगपुसणें नुसतें लपेटून घेऊन कित्येक मुलें अंग न पुसतां बसतात तेंही बरोबर नाहीं. कारण, धुतलेलें भांडें जसें आपण स्वच्छ पुसून ठेवतों त्याप्रमाणेंच आपल्या ह्या देहाचें भांडेंही आपण नीट पुसून स्वच्छ केलें पाहिजे व तें सच्छिद्र असल्यामुळें तर ह्याची विशेषच आवश्यकता आहे. कारण, नाहीं तर सर्व गात्रें नीट पुसलीं जाणार नाहींत. ह्यासाठीं एखादा थोडासा खरखरीत असा टॉवेल अगर अंगपुसणें घेऊन त्यानें आपलें अंग चांगलें खसखशीत पुसावें, अगदीं डोक्यापासून पायापर्यंत जसें आपण स्नान करतांना चोळलें तसेंच तें टॉवेलनें नीट चोळून पुसणेंही अवश्य आहे व तसें केल्यानें आपणांस किती हलकें व प्रसन्न वाटतें हें प्रत्यक्ष करूनच पाहा म्हणजे झालें! कारण, 'प्रत्यक्षासि प्रमाण नसे। भूमंडळीं ॥' असें रामदास म्हणतच आहेत. शिवाय ओल्या अंगावर वारा बसून किंवा लागून ताप वगैरे येण्याचा किंवा डोकें वगैरे दुखूं लागण्याचा जो संभव एरवीं असतो तोही ह्यानें टळेल. ह्यासाठीं आपल्या विद्येचें आद्य साधन जें शरीर त्यास ह्याप्रमाणें आपण नीट, स्वच्छ व प्रसन्न ठेवलें पाहिजे हें उघड आहे. 'विद्या' हाच आपला विद्यार्थीदशेंतला प्रमुख 'धर्म' आहे हें विसरूं नका व

शरीर माद्यं खलु धर्मसाधनम् ।

ह्या वचनांत सांगितल्याप्रमाणें त्या धर्माचें साधन जें शरीर त्याची हयगय करूं नका. चला आतां घरांत.

स्नानानंतर संध्या, नमस्कार, देवपूजा, इत्यादि कार्यें करणेंही विशेषतः मुंज झालेल्या ब्राह्मण बटूंना जरूर आहे. कारण त्यामुळें जी धार्मिक संस्काराची व शिस्तीची सवय लागते व जी प्रसन्नता मनाला मिळते, ती ह्या वयांत विशेष जरूर आहे हें मीं मागें सांगितलेंच आहे. ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांनींही संध्या नसली तरी देवपूजा वगैरे धार्मिक प्रसन्नतेच्या गोष्टी त्यांच्या त्यांच्या परीनें करण्यास हरकत नाहीं.

भोजनसमयीं आपल्या ह्या साधारणतः उष्ण प्रदेशांत अंगांत कपडे घालून जेवण्याची काय जरूर आहे बरें? पण ऐन उन्हाळ्यांतसुद्धा, अंगांतून घामाच्या धारा वाहात असतांना ह्या कपड्यांचा सोस खोट्या फॅशनच्या नांवाखालीं करून जेवणारांची कींवच करावीशी वाटते. पण मुलांनो, तुम्ही तसें करूं नका. भोजन-समयीं आपल्या आहारांत येणाऱ्या विविध रसांचा योग्य आस्वाद प्रसन्नपणें घेण्यास आपल्या स्नानानें प्रसन्न झालेल्या शरीरावर मंद मंद वायूच्या गोड झुळुका खेळूं द्या व त्यानें तुमच्या प्रसन्नतेंत भर पडूं द्या, तिला बाध आणूं नका. ह्याचा अर्थ कडाक्याच्या थंडींतही तुम्ही कुडकुडत बसा असा नव्हे. पण असे प्रसंग आपल्या ह्या उष्ण देशांत फारच थोडे हेंही त्याचबरोबर विसरतां कामा नये.

आतां खुद्द भोजनाकडे वळूं. मुलांनो, भोजनसमयीं आपण जें अन्न खातों त्यांत सत्त्व, रज आणि तम अथवा साध्या शब्दांत सांगायचें तर उत्तम, मध्यम व अधम असे तीन प्रकार असतात. तुम्ही म्हणाल, "काय? अन्नांतसुद्धा तीन प्रकार?" तर त्यावर माझें उत्तर "होय, अन्नांतच काय, ह्या जगांतल्या प्रत्येक वस्तूंत व प्राण्यांत असे तीन प्रकार आहेत. किंबहुना ह्या तीन प्रकारांनीं हें सर्व ब्रह्मांड भरलें आहे, त्या तीन प्रकारांचेंच तें झालें आहे. स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ, असे तीन प्रकार तुम्हांस ठाऊकच आहेत. त्याचप्रमाणें देव, मनुष्य आणि पशुपक्षी असेही प्रकार तुम्ही जाणतांच. अर्थात् खुद्द तुम्हां मुलांमध्येंही उत्तम, मध्यम व कनिष्ठ म्हणजेच कांहीं दैवी गुणांचीं, कांहीं मानुषी गुणांचीं व कांहीं

 आळस, अज्ञान, झोपाळूपणा, भांडकुदळपणा, चुकारतट्टूपणा, इत्यादि गुणांनीं कनिष्ठ

प्रतीचीं मुलें असतातच. अर्थात् सर्व साधुसंत, कवि, पण्डित, तत्त्ववेत्ते आणि लेखक – जनतेच्या कल्याणाची खरी खरी कळकळ वाटणारे सर्व लेखक – ह्या जगांतल्या मनुष्यांना पशूंच्या कोटींतून मनुष्यांच्या कोटींत व नंतर देवतांच्या कोटींत चढविण्यासाठीं झटत असतात.

स्वर्गांची समता धरेस झटती आणावया कोण ते ? ।
ते आम्हीच सुधा कृतीमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे ॥

असें कै. केशवसुत आपली – म्हणजे कवींची – ओळख करून देतांना म्हणतात तें ह्यासाठींच आणि माझी योग्यता जरी वरील मोठमोठ्या साधुसंतांच्या, कवींच्या, पंडितांच्या व तत्त्ववेत्त्यांच्या पायांच्या एका रजःकणाएवढी असली तरी अंतःकरणांतली तळमळ त्यांच्याच जातीची आहे व म्हणूनच मी तुम्हां विद्यार्थीवर्गांतील कनिष्ठांनीं मध्यमांत व मध्यमांनीं उत्तमांत प्रविष्ट व्हावें, ह्यासाठीं धडपडत आहें व त्यासाठींच हा ‘ मुलांचा मित्र ’ लिहीत आहें. तेव्हां त्याचा थोडाबहुत जरी उपयोग झाला तरी मी आपणांस धन्य व कृतकृत्य समजेन.

मुलांनो, खुद्द तुमच्यामध्येंसुद्धा उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार असतात म्हणून मीं वर सांगितलेंच आहे. अर्थात् उत्तमांनीं उत्तम स्थितींत राहावें व कनिष्ठांनीं मध्यम व नंतर उत्तम बनावें अशी माझी धडपड विशेष असण्याचें कारण – मुलांच्या व तरुणांच्या उन्नतीसाठीं विशेष यत्न करण्याचें कारण – अर्थात् ह्या वयांत तुमच्या शरीराप्रमाणेंच तुमची बुद्धि व मन लवचिक असतात, तीं कोवळ्या रोपाप्रमाणें वळवावींत तशीं वळतात, ओल्या मेणाप्रमाणें त्यावर उठवावेत तसे ठसे उमटतात, हेंच होय.

अशा ह्या त्रिविध गुणांनीं ह्या जगांतली प्रत्येक वस्तु व्यापलेली आहे. अर्थात् अन्नही त्यांतलेंच एक असल्यामुळें त्याचेही मग तीन प्रकार पडावेत हें साहजिकच आहे व ह्या अन्नाची म्हणजेच आहाराची विशेष खबरदारी घेण्याचें कारण ‘ जसा आहार तशी वासना ’ किंवा स्वभाव बनतो असें म्हणतात. त्यांत अतिशयोक्ति असली तरी सत्याचा अंशही बराच आहे. ‘ आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः ’ असें वचन आहे तें योग्यच आहे. कोणता आहार सात्त्विक, कोणता राजस व कोणता तामस तें

आतां मी तुम्हांला खुद्द भगवंतांनीं सर्व जगाच्या कल्याणासाठीं गायिलेल्या गीतेच्या आधारानेंच सांगतों म्हणजे झालें. ऐका भगवान् काय म्हणतात तें —

आयुःसत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥
कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥
यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥

ह्याचा अर्थ असा कीं 'आयुष्य, तेज, बळ, निरोगीपणा, सौख्य व प्रेमळपणा वाढविणारें, तसेंच 'रसाळ, मृदु व चिरकाल चांगला परिणाम करणारें आणि हृदयाला संतोष देणारें असें अन्न सात्त्विक मनुष्याला प्रिय असतें. ह्याच्या उलट अति कडवट, अति आंबट, अति तिखट, अति खारट, अति कोरडें व भयंकर झणझणीत असें अन्न कीं जें दुःख, शोक व रोग ह्यांना आमंत्रण देतें तें राजस मनुष्याला फार आवडतें आणि तिसरें म्हणजे,

प्रहराचें दिनाचेंही शिळें दुर्गंधि नीरस ।
उष्टें, पवित्र जें नाहीं अन्न तें तामसाप्रिय ॥

—श्रीगीता-सेवक

मुलांनो, तुम्हांला ह्यांपैकीं कोणतें बरें अन्न आवडेल ? अर्थात् 'सात्त्विक' हेंच तुम्ही उत्तर द्याल अशी माझी खात्री आहे व हीच तुमची आवड चिरकाल टिको अशी माझी इच्छा आहे.

अशा रीतीनें जो आहार घ्यायचा तो प्रथम परमेश्वरास अनन्य भावानें अर्पण करून, त्याला त्याचा नैवेद्य दाखवून मगच तो त्याचा प्रसाद म्हणून भक्षण करावा. ह्यांत जी एक प्रकारची प्रसन्नता आहे ती एकदम त्या अन्नावर तुटून पडून तें भक्षण करण्यांत नाहीं. परमेश्वराला अर्पण करून खाल्लेल्या अन्नांत एक प्रकारची सात्त्विक गोडीही कांहीं वेगळीच उत्पन्न होते. 'यज्जुहोषि यदश्नासि' ह्या श्लोकांत

 भगवंतांनींही हीच गोष्ट सांगितली असून अशा रीतीनें जो वागत नाहीं तो 'चोर'

आहे व तो ' पाप भक्षण करतो ' असेंही म्हटलें आहे. समर्थही मानवी प्राण्याच्या दैनंदिन व्यवहाराकडे लक्ष देऊन त्यास देवाची आठवण ठेवण्याचा उपदेश करतात,

साहेबासी लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
आणि देवासी विसरावें । हें कोण शहाणपण ? ॥

अशा रीतीनें ईश्वरार्पणपूर्वक अन्न भक्षण करतांना तें प्रसन्न मनानें देवाचें नामस्मरण करीत घ्यावें, कारण यज्ञांत जशी अग्निनारायणाला आहुति देतात त्याप्रमाणें पोटांतील अग्नीला – जठराग्नीला – वैश्वानराला – ही आपण आहुतिच देत असतों व हें छोटेंसें यज्ञकर्मच करीत असतों असें एक कवि म्हणतो त्यांत किती उच्च आणि उदात्त भावना भरली आहे बरें ?

वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें ।
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें ॥
जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्णब्रह्म ।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥

भोजन करीत असतां मन प्रसन्न असलें तरच तें अंगीं लागतें. रागावणें व धुसफुस ह्यांनीं पंचपक्वान्नाचें भोजनही विषासारखें कडू लागतें आणि प्रसन्न मनानें खाल्लेली चटणीभाकरही अमृताप्रमाणें मधुर वाटते ह्याचें कारण ह्या मनःस्थितींतला फरकच होय. कारण बाह्य अन्नापेक्षांही अमृताचा झरा आपल्या आत्म्यांत आहे, मनांत आहे आणि म्हणूनच पंचपक्वान्नाच्या ताटावर बसणाऱ्या मनुष्यालाही जें समाधान लाभत नाहीं तें शेतावर चटणीभाकर खाणाऱ्या शेतकऱ्याला लाभतें.

आहार किती घ्यावा ? ' पोटभर ' का ' पोटापुरता ' ? ह्याचें उत्तर ' पोटापुरता ' असेंच दिलें पाहिजे. कारण अतिखाण्यानें आळस व नाना रोग जडतात. ' भुकी तो सुखी ! ' ही म्हण सुखाची – शारीरिक सुखाची – गुरुकिल्लीच आपल्या हातीं देत आहे. तेव्हां ती घेऊन आपल्या सुखाचें दालन उघडा. विद्यार्थीदशा हा एक योग आहे, तपश्चर्या आहे. अति खाण्यानें सुस्ति येते व आपल्या योगसाधनांत म्हणजेच अभ्यासांत ढिलाई होऊन अंतर पडतें – व्यत्यय येतो. म्हणूनच भगवान् म्हणतात **' नात्यश्नतस्तु योगोऽस्ति '** म्हणजे अति खाणाराला हा योग साधत नाहीं.

' खाण्यानें जितकीं माणसें मरतात तितकीं उपासानें मरत नाहींत ' असें एका डॉक्टरनें म्हटलें आहे. चटणीभाकर खाणाऱ्या मावळ्यांनीं स्वराज्य कमावलें, हुरड्याचीं कणसें हातावर चोळून खाणाऱ्या बाजीरावानें तें वाढविलें व ' हर हर महादेव ! ' करून, शत्रूंवर नव्हे तर बुंदीच्या लाडवांवर तुटून पडणाऱ्या रावबाजींनीं तें घालविलें हा महाराष्ट्राचा साधा इतिहास हेंच आपणांस सांगतो. **' उत्तर गेली गाण्यानें नि दक्षिण गेली खाण्यानें ! '** हें वाक्य ह्याचेंच दर्शक आहे.

सारांश, जें अन्न भक्षण करावयाचें तें आपल्या ध्येयाच्या आड येणार नाहीं अशा बेतानें खा. ' जगण्यासाठीं खा, खाण्यासाठीं जगूं नका ! ' असा आदेश थोर लोक आपणांस देत आहेत, तो विसरूं नका.

शिवाय ' खरी भूक ' आणि ' खोटी भूक ' ह्यांत महदंतर आहे. साध्या कोरड्या भाकरीच्या दर्शनानेंही जेव्हां आपली जिव्हा लाळ घोटूं लागेल तेव्हांच आपणांस खरी चरचरीत भूक लागली असें समजावें व म्हणूनच ' भुकेला कोंडा नि निजेला धोंडा ' अशी म्हण आपल्यांत चालत आली आहे. खऱ्या खऱ्या थकल्या भागलेल्या जीवाला जशी कोठेंही पडल्याबरोबर पटकन् सुखाची झोप लागते त्याचप्रमाणें खऱ्या खऱ्या भुकेल्या जीवालाही साधें अन्नसुद्धा रुचकर लागतें आणि ह्याच्याच उलट छप्परपलंगावर झोपणाऱ्या श्रीमंताला व्यायामादिकाच्या अभावीं जशी सुखनिद्रा येत नाहीं त्याचप्रमाणें खोट्या भुकेचे चोजले पुरविणाऱ्यालाच खमंग व मसालेदार पदार्थ लागतात व तरीही त्याला अन्नाची खरी गोडी कळत नाहीं ती नाहींच ! ह्यासाठीं खरी चरचरीत भूक लागली असतांनाच अन्न सेवन करा म्हणजे साध्या अन्नांतही अमृताचा झरा उत्पन्न होईल व तो तुमच्या अंगीं लागेल.

शेवटचा मुद्दा, अन्नाचें सेवन. तें कसें करावें ? सावकाश कीं घाईनें ? तर अर्थात सावकाश म्हणजे अन्नाचें नीट चर्वण करून तें भक्षिलें पाहिजे. 'People forget that God has given us teeth in our mouth, not in our stomach' म्हणजे ' लोक विसरतात कीं ईश्वरानें आपल्याला दांत आपल्या तोंडांत दिले आहेत, पोटांत नव्हे ' असें एक डॉक्टर म्हणतात

त्याच्यांतही हेंच तत्त्व त्यांना सांगावयाचें आहे. तुमच्यापैकीं पुष्कळ मुलें

जेवणाला उशीरा येतात व मग घाईघाईनें कसेंबसें अन्न पोटांत ढकलून शाळेकडे धांवत सुटतात. अशा खाण्यानें तें अन्न कसें बरें अंगीं लागेल ?

' घासामागें घास घेतला । अवघा बोकणाचि भरला । '

अशा रीतीनें वकाबका अन्न खाऊन तें नीट न चावतां गिळणें म्हणजे पोटाला जास्त काम देऊन रोगाला एक प्रकारचें आमंत्रणच देणें नव्हे काय ? ह्यासाठीं ' प्रत्येक घास बत्तीस वेळां चावून खावा ' असा वैद्यशास्त्राचा नियम जरी ह्या धावपळीच्या आयुष्यांत आपणांस दुर्दैवानें तंतोतंत पाळतां आला नाहीं, तरी त्यांतल्या त्यांत तो होईल तितका पाळा व त्यासाठीं भोजनाला वेळेवर येत जा. ' अन्नमय प्राण व प्राणमय पराक्रम ' अशी म्हण आहे. पण तें अन्नच जर नीट भक्षण केलें नसेल तर विद्यासाधनाचा पराक्रम तरी आपल्या हातून कसा बरें नीट पार पडेल ? ह्यासाठीं त्या पराक्रमाच्या आधारभूत प्राणाला पोषक असें जें अन्न तें सावकाश व नीट चावून खा, घाई करूं नका. मोठ्या भोजनाच्या पंक्तींत यजमान ' सावकाश होऊं द्या ' म्हणून प्रत्येक पाहुण्यापुढें उभे राहून हसतमुखानें हात जोडून प्रार्थना करतात त्यांतही हेंच आरोग्याचें तत्त्व भरलें आहे. घाई ही केव्हांही नाशकारक असते. ' Haste makes waste ' ' केली घाई आणि नाश नेई ! ' ह्यासाठीं सावकाश अन्नभक्षणाचा नियम विसरूं नका व त्यासाठीं वेळेवर जेवणास येणें, त्यासाठीं वेळेवर अभ्यास करणें व त्यास पूर्ण वेळ सापडावा म्हणून पहाटे उठणें ही साखळी – दिवसाच्या सुरुवातीपासूनची साखळी – विसरूं नका ! एकंदरींत पहाटे उठण्याचें महत्त्व व जरुरी घरच्या सकाळच्या सर्व कार्याला किती आवश्यक असते हें आतां तरी तुमच्या लक्षांत आलें ना ? चला आतां आंचवण्यास.

आंचवतांनाही कित्येक मुलें कशींबशीं आंचवतात व त्यामुळें व्यवस्थितपणाच्या व स्वच्छतेच्या सवयीलाही तीं आंचवतात. त्यांच्या हाताच्या बोटांमधून खरकटें तसेंच राहिलेलें असतें. तरी हात नीट स्वच्छ धुवा. त्याचप्रमाणें तोंड नीट चुळा भरून खळखळून धुवा म्हणजे दांतांच्या व दाढांच्या फटींतून अन्नकण राहाणार नाहींत. मग तोंड व हात स्वच्छ पुसून घरांत चला.

भोजनानंतर लगेच पुस्तकें घाईघाईनें पिशवींत कोंबण्यापेक्षां आधीं वेळापत्रका-प्रमाणें आपली पिशवी नीट भरून ठेवलेली चांगली. म्हणजे मग धांदल होत नाहीं

व पुस्तकें विसरत नाहींत. तसेंच भोजनानंतर घटकाभर म्हणजे सुमारें अर्धा तास, निदान पंधरा मिनिटें तरी, विश्रांति घेऊन मग शाळेंत जाणें चांगलें. भरल्या पोटीं घाईघाईनें शाळेकडे धावण्यानें अन्नपचन नीट होत नाहीं. वास्तविक भोजनानंतर तास दोन तास कोणत्याही तऱ्हेचा शारीरिक वा बौद्धिक ताण विद्यार्थ्यांच्या शरीरावर पडूं नये ह्यासाठीं लहान मुलांच्या शाळा जशा दुवक्ता असतात तशाच हायस्कूल-विद्यार्थ्यांच्याही सकाळीं ७ ते १० व दुपारीं २ ते ५ अशा शाळा झाल्यास तें फारच चांगलें होईल. सुज्ञ डॉक्टर व शिक्षणतज्ज्ञ त्या दृष्टीनें आजवर खटपट करीत आले आहेत. पण अद्याप त्यांच्या प्रयत्नाला यश आलेलें नाहीं, ही दुर्दैवाची गोष्ट होय. तें केव्हां येईल तेव्हां येवो. तोंपर्यंत मुलांनो, तुम्ही एवढें तरी करा कीं, वर म्हटल्याप्रमाणें भोजनोत्तर थोडा वेळ विश्रांति घेऊन मग व्यवस्थित कपडे घालून शाळेस जा व तेंही धावपळ न करतां जा. आपले कपडे गरिबीचे असले तरी स्वच्छ असूं द्या. 'तेली भांडायला येईल' असे ते नसावेत. तसेच फाटकेही नसावेत. फाटल्यास वेळेवर शिवीत जा व त्या कामीं 'A stitch in time saves nine' ही म्हण लक्षांत ठेवा.

शाळेस वेळेवर गेलें पाहिजे, शाळेंत निदान पहिल्या घंटेला हजर राहिलें पाहिजे. कित्येक मुलांना रमतगमत व वाटेवरील गमती पाहात जाण्याची सवय असते व त्यामुळें त्यांना शाळेस उशीर होतो आणि घंटेचे मार्क व प्रार्थना तर बुडतेच, आणि वर मास्तरांचीं बोलणींही खावीं लागतात नि क्वचित् अभ्यासही बुडतो. इतके अनर्थ केवळ ह्या रमतगमत जाण्यानें होतात. जीं चुकारतट्टू मुलें आपल्या कर्तव्याविषयीं बेपर्वा असतात व अभ्यासाची गोणी कशीतरी वाहायची अशी ज्यांची वृत्ति असते असलींच मुलें असें करतात. 'आयुष्य ही चैन नसून तें एक कर्तव्य आहे,' त्यांतल्या त्यांत विद्यार्थीदशा ही फार महत्त्वाची दशा आहे, ती एक तपश्चर्या आहे, हें ज्यांच्या मनावर पूर्ण बिंबलेलें असतें तीं मुलें असें कधींही करीत नाहींत. झाली पुरेशी विश्रांति. चला आतां मी तुम्हांला शाळेंत घेऊन जातों.

प्रकरण चौथें

शाळेंत : १

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र ... नों. दि ...
वि. ...

मुलांनो, ही पाहा आली शाळा. ऐका हा पहिल्या घंटेचा गजर. तो आपणांस काय सांगतो बरें? वर्गांत जाऊन आपलें पाटीदप्तर ठेवून लघवी, पाणी पिणें वगैरे उरकून घेण्यासच तो सांगत नाहीं काय? पण कित्येक मुलें तिकडे दुर्लक्ष करून खेळत असतात व दुसऱ्या घंटेला कशींबशीं सावध होतात आणि धावाधाव करूं लागतात, अगर तशींच प्रार्थनेसाठीं वर्गांत धावून मग वर्ग चालू असतां लघवी, पाणी पिणें ह्यांसाठीं परवानग्या मागत सुटतात. पण हें बरोबर आहे काय? ही पाहा दुसरी घंटा झाली. चला तर आतां वर्गांत नि लागा प्रार्थनेला.

ही प्रार्थनेची पद्धत अलीकडे बरींच वर्षें सर्व शाळांतून सुरू करण्यांत आली असून तींत परमेश्वराच्या प्रार्थनापर व मायभूमीच्या वंदनपर असे सुस्वर अभंग व गीतें वगैरे म्हटलीं जाण्याची व्यवस्था विविध शाळांच्या चालकांनीं केली आहे ही फार संतोषाची गोष्ट आहे. पण प्रत्यक्ष प्रार्थनेच्या वेळीं आपण वर्गावर्गांतून — अथवा एकत्र जमावानें होत असल्यास त्या विद्यार्थीसमूहावर — दृष्टिक्षेप केल्यास आपणांस काय बरें दिसतें? अनन्य-भावानें ईश्वरास व मायभूमीस तेवढीं दोनचार मिनिटें तरी एकाग्र मनानें वंदन करणारीं मुलें फारच थोडीं दिसत असून

बाकीचीं आपल्या मर्कटसदृश मनाच्या अशा वेळींही स्वाधीन होऊन केवळ प्रार्थनेचा बाह्य देखावा करणारीं पण एकीकडे हलकेच दुसऱ्यांशीं बोलणारीं, हसणारीं किंवा इकडे तिकडे पाहाणारीं मुलेंच आपल्या जास्त दृष्टीस पडत नाहींत काय? आणि असें करणें चांगलें आहे असें खुद्द तें करणारीं मुलें तरी म्हणूं शकतील काय? पण आपल्या ओढाळ मनाला तेवढा वेळसुद्धा आवरून तें अनन्य भावानें देवाच्या व देशाच्या चरणीं लावण्याच्या कामीं तीं बेपर्वा असतात. त्यांना तें कळत नाहीं असें नाहीं, कारण शाळेच्या शिक्षणांत ईश्वराची थोरवी व मायदेशाचा गौरव कितीदा तरी त्यांच्या कानांवरून जात असतो. पण ह्या गोष्टी मनावर ठसवून घेतल्या तरच त्यांच्या हातून बेपर्वाईचें वर्तन होणार नाहीं. ‘ कळतें पण वळत नाहीं ’ म्हणतात तें अशांच्या बाबतींत! पण अशी बेपर्वाई चांगली का आहे? ह्यासाठीं तुमच्यापैकीं कोणाच्या हातून आजवर तशी चूक झाली असल्यास पुन्हा करूं नका, आपला मित्रही ती करणार नाहीं ह्याबद्दल शक्य ती खटपट करा व तरीही तो न सुधारल्यास त्याची मैत्री सोडून द्या. कारण आपल्या देशाविषयीं व देवाविषयीं ज्याला खरें प्रेम व आस्था नाहीं तो पुढें कीर्तीचे काय दिवे लावणार व तो तुमच्यासारख्या मुलांच्या मैत्रीला किती लायक आहे हें दिसतेंच आहे!

प्रार्थना करतांना अनन्यचिंतनपूर्वक व हृदय भरून येऊन ती झाली पाहिजे. म्हणूनच आरडाओरडा न करतां, शांत, गंभीर व मंद स्वरांत ती झाली पाहिजे. ‘When the heart is full the tongue is slow.’ कोणत्याही भावनेनें आपलें हृदय कांठोकांठ भरलें असतां आपल्या मुखांतून वाणी मंदपणेंच बाहेर पडते. ह्यासाठीं प्रार्थनेचा रिकामा आरडाओरडा करून आपलें हृदय रिकाम्या भांड्याप्रमाणें भावनाशून्य आहे असें दाखवूं नका; तर हळू व सावकाश अशा प्रार्थनांनीं तें एकाग्र झाल्याचें व उच्च भावनांनीं भरल्याचेंच तुमच्या शिक्षकांना दाखवा म्हणजे त्यांनाही आनंद होईल. बसा आतां खालीं. कारण ती पाहा तिसरी घंटा झाली व शिक्षक वर्गांत येण्याची वेळ झाली.

वास्तविक हीं दोन तीन मिनिटें पहिल्या तासाच्या अभ्यासासाठीं सर्व साहित्यानिशीं सिद्ध होण्यांत खर्च करण्याच्या दृष्टीनें किती बरें महत्त्वाचीं असतात? पण बरींच मुलें अशा वेळींही ह्याकडे दुर्लक्ष करून खुशाल गप्पाटप्पा

करीत असतात व कित्येक तर आरडाओरड करून गोंधळ घालीत असतात. बिचारा वर्गाचा मॉनिटर 'बोलूं नका', 'गडबड करूं नका' म्हणून सांगतच असतो आणि शिक्षक येईपर्यंत त्याची आज्ञा मानावी असा तुमच्या शाळेचा नियमही असतो. पण शाळेच्या नियमांचा भंग करण्यांतच भूषण मानणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना त्याच्या आज्ञेचें काय होय ? वास्तविक त्या शाळेच्या नियमांत वावगें असें काय आहे बरें ? कारण, शिक्षक नसतांना प्रत्येक वर्गांत जर असा गोंधळ नि आरडाओरडा चालू राहिला तर त्या सर्व वर्गांची मिळून बनलेली तुमची शाळा ही शाळा नसून 'बाजार' आहे असेंच होणार नाहीं काय ? आपलें कर्तव्य योग्य रीतीनें करण्याचें ठरविल्यास अशी आज्ञा मोडण्याचें तुम्हांला कारणही पडणार नाहीं. प्रार्थना संपून वर्ग सुरु होण्याची तिसरी घंटा झाल्यानंतरचीं जीं एकदोन मिनिटें सापडतात त्यांचा उपयोग वास्तविक आपण आपलें त्या तासाचें पुस्तक व वही काढून त्या पुस्तकांतला कोणता भाग आज शिकविला जाणार आहे त्या पानांत खूण घालून ठेवून व त्या वहीवर कालपर्यंत झालेल्या अभ्यासाच्या खालीं रेघ ओढून, आजची तारीख वगैरे घालून नवीन अभ्यासाला सिद्ध होऊन बसण्याकडे करावयास नको काय ? आणि असें केल्यास तुम्हांला इतरांशीं बोलायला वेळ तरी मिळेल काय ? बरें, इतकेंही करून मिळालाच किंवा अगदीं तातडीचें बोलण्याची जरूर पडलीच तर मॉनिटरच्या परवानगीनें हळूहळू व गोंधळ न करतां बोलतां येणार नाहीं काय ? पण इतकी शिस्त पाळल्यावर मग काय पाहिजे ? अशा शिस्तीचे धडे अगदीं लहानपणापासून घरीं, दारीं व तुमच्या शालागृहांतून पदोपदीं तुम्हांस घ्यावे लागतात व तसे ते घेतले तरच पुढें शिस्तशीर व आज्ञापालनतत्पर असें राष्ट्र निर्माण होतें. ह्या गोष्टी एकदम कधींच होत नाहींत. 'जो उत्तम आज्ञा पाळतो तोच उत्तम सेनापति होतो' अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. लहान लहान गोष्टी व लहान लहान प्रसंग असतात पण त्यांचें महत्त्व फार असतें. 'Little things of great value' ही म्हण ह्याचीच दर्शक आहे. ह्यासाठीं ह्या सर्व गोष्टींचें महत्त्व लक्षांत घेऊन शिस्त व आज्ञापालन आनंदानें करण्यास चुकूं नका, कारण त्यासाठींच तुमचें हें वय आहे. ते पाहा तुमचे शिक्षक आले. उठा व त्यांना आदरपूर्वक 'नमस्ते' किंवा 'वंदे मातरम्' इत्यादि जी

कांहीं तुमची रीत असेल त्याप्रमाणें 'मानवंदना' द्या. कारण, अगदीं लष्करी नसली तरी ती एक नागरी शिस्त आहे. स्वदेशाच्या कार्यासाठीं लष्करी लोकांप्रमाणेंच शिस्तीनें तयार झालेल्या नागरिकांचाही जरूर तर अल्पकाळांत लष्करी शिक्षण देऊन उपयोग करतां येतो. आपण आपल्या राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहांत व त्यासाठीं शालेय शिक्षणाबरोबर पदोपदीं शिस्तीचें व आज्ञापालनाचें शिक्षण घेणें हें आपलें परम पवित्र कर्तव्य आहे.

कित्येक मुलें अशाही वेळीं आपलें कर्तव्य पाळीत नाहींत, इतकेंच नव्हे, तर वर्गांत शिक्षक आल्यावरही दोनतीन मिनिटें त्यांची गडबड नि बडबड चाललेली असते ! ह्याचा पुढचा परिणाम म्हणजे शिक्षकांनीं जर एकदम शिकविण्यास सुरुवात केली तर 'थांबा सर' म्हणून मग पुस्तकें व वह्या काढण्यास अशा मुलांची सुरुवात होते व 'कोणतें पान सर?' असें तींच उलट शिक्षकांना विचारीत सुटतात ! स्वतःचें कर्तव्य नीट न केल्याचाच हा परिणाम नव्हे काय ?

आतां तुमच्या रफ वह्यांसंबंधीं थोडेंसें सांगून मग तुमच्या शिक्षणाकडे वळूं.

कित्येक मुलांच्या रफ वह्या म्हणजे सर्व विषयांची एक खिचडीच असते. त्यांत वेगवेगळे विभागसुद्धा पाडलेले नसतात. ह्यापेक्षां प्रत्येक विषयाला वेगवेगळी रफ वही केल्यास किंवा एकच मोठी वही करण्याची हौस असल्यास त्यांत वेगवेगळे विभाग करून त्यांच्या पानांवर क्रमांक घालून त्यांची म्हणजे त्या विषयांची अनुक्रमवार नोंद पहिल्या पानावर 'अनुक्रमणिके' च्या रूपानें केल्यास तें तुम्हांलाही सोयीस्कर पडेल, शिक्षकांनाही आवडेल, इतकेंच नव्हे तर तुमच्या रफ वह्याही पाहाण्याचा अधिकार असलेल्या इन्स्पेक्टरना किंवा डेप्युटींनासुद्धा तें आवडेल. ह्या वहीवर अभ्यासाशिवाय इतर सटरफटर मजकूर लिहिणें, डाग पाडणें, चित्रें काढणें वगैरे प्रकारही कित्येक मुलें करतात, तसे तुम्ही करूं नका, तरच तुम्ही 'व्यवस्थित विद्यार्थी' ठराल.

ह्यानंतर अभ्यास चालू असतां तुमच्या ज्या कित्येक चुका होत असतात त्यांचा निर्देश करून व त्या कामीं योग्य त्या सूचना तुम्हांला प्रथम देऊन मगच तुमच्या अभ्यासाकडे वळणें बरें.

पहिली चूक अभ्यास चालू असतां त्याकडे दुर्लक्ष करण्याची किंवा दुसऱ्याशीं बोलत राहाण्याची. स्वतः दुर्लक्ष केल्यास स्वतःचाच अभ्यास बुडतो, पण दुसऱ्याशीं बोलल्यानें आपण त्याचाही अभ्यास बुडवितों इतकेंच नव्हे, तर जवळच्याही चारदोन मुलांचें लक्ष आपणांकडे वेधून घेऊन त्यांच्याही एकाग्रतेला व्यत्यय आणतों. शिवाय शिक्षकांचें लक्ष सर्व वर्गावर असल्यामुळें व त्यांना शिकवितांना सर्वांची एकाग्रता व्हावी असें वाटत असल्यामुळें आपण त्यांच्याही शिकविण्यास व्यत्यय आणण्यास कारणीभूत होतों व त्यांच्या कळकळीच्या शिक्षणाचा रसभंग करतों. त्यामुळें आपल्याला शिक्षाही कधींकधीं भोगावी लागते. ह्यासाठीं तुम्ही असें करूं नका व दुसरा कोणी तुमचें लक्ष वेधूं लागल्यास प्रथम हाताच्या खुणेनें त्यास गप्प करा, व तरीही तो त्रास देऊं लागल्यास त्याची तक्रार शिक्षकाकडे न्या. कारण तुमच्या-प्रमाणें त्याला वैयक्तिक व सामाजिक शिस्तीचें पालन करायचें नसतें आणि शिस्तभंगाबद्दल सूचना देऊनही शिस्तभंग केल्यास त्याला शासन हें झालेंच पाहिजे.

दुसरी चूक बसून बोलण्याची, एकदम अनेकांनीं बोलण्याची व परवानगी नसतां बोलण्याची, अशी तिहेरी असते. शिक्षकांनीं उभें राहून शिकवायचें व आपण मात्र द्रुढ्ढाचार्यासारखें बसून त्यांना उत्तर द्यायचें हें आपणांला शोभतें का ? फार काय, शिक्षक बसून शिकवीत असले तरीही त्यांना आदरपूर्वक उत्तर देण्यास व ३०।४० मुलांच्या वर्गांत कोण नेमकें बोलत आहे तें त्यांना व सर्व वर्गालाही दिसण्यास सोयीस्कर पडावें म्हणून उभें राहूनच उत्तर देणें योग्य. हीच गोष्ट शिक्षकांना कांहीं शंका वगैरे विचारतांना ध्यानांत ठेवावी.

एकदम दहापांच मुलांनीं बोलणें ही दुहेरी चूक होते. कारण एक तर इतक्यांना विचारलेलें नसतें व शिवाय वर्गांत गडबड होऊन एकाचेंही बोलणें नीट कळत नाहीं. परवानगीशिवाय बोलणें ही तिहेरी चूक. ती होऊं नये म्हणून ‘ मला उत्तर देतां येतें ’ किंवा ‘ मला बोलावयाचें आहे ’ असें शिक्षकांना कळविण्यासाठीं प्रथम हात वर करा. परवानगी मिळाल्यास बोला अगर उत्तर द्या. तें पण बसून नव्हे, तर उभें राहून. तरच तुम्ही शिस्तशीर विद्यार्थी ठराल.

तिसरी चूक म्हणजे वर्ग चालू असतां लघवी, पाणी पिणें, वगैरेसाठीं परवानगी मागण्याची. परवानगी मागणें हें चांगलें असलें तरी वरीलसारख्या गोष्टींना आपण

लहानमोठ्या अशा मधल्या सुट्टींतच वाव दिला पाहिजे. तसें न केल्यास अभ्यासाच्या अखंडपणाला व एकाग्रतेला व्यत्यय येत नाहीं काय ? ह्यासाठीं असा प्रसंगच होतां होईतों आणूं नका आणि अगदीं तशीच जरूर पडल्याशिवाय मध्येंच वर्गाबाहेर जाण्याची परवानगी मागूं नका. अशा अधेंमधें जाण्यानें आपलाही तेवढा अभ्यास बुडत नाहीं काय ? कारण अशा मुलासाठीं शिक्षकानें थांबायचें म्हटल्यास त्या तासाचा अभ्यास कसा व्हायचा ?

चौथी चूक वर्गांत बोरें, शेंगा, इत्यादि खात बसणें ही होय. वर्ग ही खात बसण्याची जागा नसून शिकण्याची जागा आहे. एखाद्या मिजासखोर राजासारखें खात खात शिकायचें व त्यामुळें दुसऱ्या मुलांच्या तोंडाला पाणी सुटेल व त्यांचें लक्ष आपणांकडे वेधेल असें करून त्यांच्या शिक्षणांत व्यत्यय आणायचा हा कोठला न्याय ? ह्यासाठीं इथेंही आत्मसंयमनाचा धडा तुम्हीं गिरविला पाहिजे.

पांचवी चूक म्हणजे वर्गांत उशिरा येऊन मुकाट्यानें मागील बाकावर न बसतां इतरांशीं बोलत बसणें किंवा अशा उशिरा येणाराशीं आपण बोलत बसणें ही होय. उशिरा येणें हीच पहिली चूक पण त्यासाठीं आपण मुकाट्यानें रिकाम्या जागीं जाऊन वरील चुकीसाठीं उभें राहाण्याची शिक्षा असल्यास उभें राहावें व शिक्षकांच्या परवानगीनें बसावें. तशी शिक्षा नसल्यास तसेंच बसून शेजारच्या मुलाच्या पुस्तकांत पान पाहून तें पान काढून व फळ्याकडे दृष्टि देऊन शिक्षकांच्या शिकविण्याकडे मन लावणें व शक्य तितक्या लवकर चालू विषयाशीं इतर मुलांप्रमाणें तद्रूप होणें, हेंच योग्य. उशिरा येणाऱ्या मुलांना वर्गाबाहेर तासभर उभें राहाण्याची शिक्षाही, तशी चूक पुन्हा होऊं नये व वर्गांत व्यत्यय येऊं नये म्हणून, कोणी कोणी देतात व तीं योग्यच आहे, पण अशाही स्थितींत आपण, बाहेरूनच कां होईना, पण वर्गांतील अभ्यासाकडे शक्य तितकें लक्ष द्यावें व पुन्हा अशी चूक करूं नये. तसेंच बाहेर उभें राहाण्याची शिक्षा नसली तरी उशिरा येण्याच्या कारणाची किंवा एखाद्या दिवशीं आपण गैरहजर राहून दुसऱ्या दिवशीं शाळेंत गेल्यास तसें कां झालें ह्याच्या खुलाशाची आपल्या पालकांची चिठ्ठीही बरोबर आणल्यास पालकांनाही त्याची जाणीव राहाते व शिक्षकांनाही मुलाचा आस्थेवाईकपणा पाहून बरें वाटतें.

वरील चुकींतलाच एक पोटभाग म्हणजे कांहीं मुलें क्षुल्लक कारणास्तव एकएक दोनदोनच काय, पण आठआठ दिवसही शाळा बुडवितात. त्यांतील एक प्रमुख कारण म्हणजे परगांवच्या अगर गांवांतल्याच त्या मुलाच्या ‘ कोणत्या तरी दूरच्या नात्याच्या मुलाची मुंज किंवा मुलीचें लग्न होतें!’ जणूं कांहीं ह्या मुलावांचून तें अगदीं नडूनच राहाणार होतें! ह्याशिवाय दुसरें प्रमुख कारण म्हणजे ‘ आमच्या घरीं पाहुणे आले होते!’ जणूं काय ह्या मुलावांचून त्यांच्या आदरातिथ्याला दुसरें कोणी घरीं नव्हतेंच! साधारणपणें पाहातां अशाच क्षुल्लक सबबीवर अभ्यास टाळण्याची व शाळा बुडविण्याची वृत्ति, इतकेंच नव्हे तर, ‘ कालचा अभ्यास कां केला नाहींस?’ म्हणून विचारल्यास ‘ गैरहजर होतों सर’ असें मोठ्या आढ्यतेनें उत्तर देण्याची प्रवृत्तिही दिसून येते. जणूं काय गैरहजर राहाणें म्हणजे अभ्यास न करण्याचा परवानाच! ‘ आपण गैरहजर राहिलों हीच आधीं केवढी चूक झाली’ असें वाटून त्याच सायंकाळीं किंवा दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या मित्राकडे जाऊन ‘ काल काय काय झालें व काय काय अभ्यास सांगितला’ तें विचारून घेऊन त्यांतला शक्य तितका करून नेण्याची नम्र वृत्ति क्वचितच कोणामध्यें दृष्टीस पडते. म्हणून मुलांनो, वरीलसारख्या क्षुद्र कारणावरून गैरहजर राहातच जाऊं नका. ‘ आपण अगोदर विद्यार्थी व मग इतर सर्व’ ही गोष्ट कधींही विसरूं नका व त्या ‘ विद्यार्थी’ पणाच्या दशेला व्यत्यय आणूं पाहाणारे क्षुद्र पण मोहक प्रसंग टाळवतील तितके टाळा, तरच तुमचा अभ्यास उत्तम होईल व तुम्ही ‘ खरे विद्यार्थी’ ठराल. प्रत्यक्ष हजर असून साक्षात् गुरुमुखांतून तें तें ज्ञान ग्रहण करणें ह्यांत व त्या ज्ञानाची माहिती मागाहून आपल्या मित्राकडून करून घेणें ह्यांत महदंतर आहे. व्याख्यात्याच्या व्याख्यानाला किंवा नटांच्या नाट्यप्रयोगाला स्वतः हजर राहून तें व्याख्यान ऐकणें किंवा तो नाट्यप्रयोग पाहाणें व उलट त्या व्याख्यानाचा रिपोर्ट वृत्तपत्रांतून वाचणें किंवा तें नाटक घरीं पुस्तकांतून वाचणें ह्यांत फार अंतर असतें. म्हणूनच श्रोत्यांच्या झुंडीच्या झुंडी व्याख्यानाला किंवा नाटकाला जातात. ह्यासाठीं होतांहोईतों शाळा मुळींच चुकवूं नका.

ह्यानंतरची चूक म्हणजे दऊत, टाक, टीपकागद, पेन्सिल, रबर, चाकू, फूटपट्टी व त्या त्या विषयाचें पुस्तक घरीं विसरून किंवा विकत घेण्याची टाळाटाळ करून

वर्गांत अभ्यासाच्या वेळीं ह्या गोष्टी एकमेकांना मागत सुटणें व त्यासाठीं परवानगी-वांचून हालचाल करीत राहाणें ही होय. वास्तविक वरीलपैकीं पुस्तकें सोडून दिल्यास इतर कितीतरी वस्तु अगदीं थोड्या किंमतीच्याच असतात. पण तेवढ्याही घेण्याची टाळाटाळ किंवा आळस करायचा व शाईनें लिहिलेला मजकूर टिपण्यास दुसऱ्याजवळ टीपकागदाची भीक मागायची किंवा चुन्याच्या भिंतींचा उपयोग त्यासाठीं करून त्या शाईनें चिताडायच्या ही वृत्ति फार वाईट. ह्यासाठीं अशी हयगय करूं नका व भीक मागूं नका आणि क्वचित् मागणें झाल्यास किंवा त्यासाठीं वर्गांत हालचाल करणें झाल्यास ती शिक्षकाच्या परवानगीनें करा.

ह्यानंतरची चूक अगदीं वर्ग चालू असतांही कागदाचे तुकडे वगैरे इकडे तिकडे टाकणें ही होय. वर्ग सुरू होण्याच्या आधीं व मधल्या लहानमोठ्या सुट्टींत तर शेंगांचीं टरफलें व भिकारटाकार कागद फाडून वर्गांत इकडे तिकडे किती तरी टाकले जातात. पण ह्या सर्वांसाठीं 'टाकाऊ कागदांची टोपली' वर्गाच्या कोपऱ्यांत असते तिचा उपयोग करणें व नसल्यास ती वर्गशिक्षकाकडून अगर मुख्याध्यापकाकडून मागून घेऊन तिचा उपयोग करणें हें आपलें कर्तव्य नाहीं काय? पण केरकचऱ्याची व बेशिस्तपणाचीच आवड असल्यास कोण काय करणार? पण ह्यासाठीं शिक्षक आपणांस रागें भरतात व मग तरी आपणांस तें करावें लागतेंच ना? मग त्यापेक्षां आपणच तें केलें व व्यवस्थित वागलों तर अधिक बरें नाहीं काय?

ह्यानंतरची व फार मोठी चूक म्हणजे वर्गांत वाचन किंवा कविता म्हणणें ह्यांची पाळी चालली असतां व लेखी प्रश्नांचीं उत्तरें लिहिणें किंवा उदाहरणें वगैरे सोडविणें हीं कामें चालू असतां दुसऱ्याला विचारणें किंवा सांगणें ही होय! पण ह्या मोठ्या चुकीबद्दलचें विवेचन पुढल्याच प्रकरणाच्या प्रारंभीं करून मग तुमच्या अभ्यासाकडे वळेन.

प्रकरण पांचवें

शाळेंत : २

'बोलूं नका, सांगूं नका, पाहूं नका, दाखवूं नका' ही 'नका' ची चतुःसूत्री खऱ्या शिक्षणसंपादनाच्या कामीं वर्गांत उपयोगी पडणारी आहे. तुमचे शिक्षक तुमच्या वर्गांतील लेखनाच्या कामीं तुमची बुद्धि पारखून पाहाण्याच्या वेळीं, ही चतुःसूत्रीं एकसारखी सांगत असतात. शाळेंतील शिस्तीचें पालन करून खरें शिक्षण प्राप्त होण्यास तुम्हांस वरील चतुःसूत्रीची फार मोठी मदत होईल.

'**जेणें विठ्ठलमात्रा घ्यावी। तेणें पथ्यें संभाळावीं॥**' असें तुकोबांचें वचन आहे. त्याचप्रमाणें ही शाळेच्या वर्गांतील विद्यासंपादनाची 'मात्रा' ज्याला घेणें असेल त्यानें वरील चार 'नका' चीं 'पथ्यें' सांभाळलीं पाहिजेत. 'विठ्ठलमात्रे' नें जसा 'भवरोग' जातो, तसा 'शिक्षणमात्रे' नें त्याच्या 'अज्ञानाचा रोग' खराखरा हटेल. एरवीं तो वरवर हटलासा वाटला, तरी त्याचें मूळ कायमच राहील व तो केव्हां परत उद्भवून दगा देईल व आपली फजिती उडवील ह्याचा नेम नाहीं. कारण 'बांधलेली शिदोरी अन् सांगितलेलें ज्ञान' हें कधीं पुरवठ्यास पुरत नाहीं. 'खरें केव्हां तरी बाहेर पडणारच' ह्या न्यायानें शाळेंतील वर्गापासून तों परीक्षेच्या मंडपापर्यंत तुमच्याकडून केल्या जाणाऱ्या 'कॉपी करण्याच्या' म्हणजेच

'पाहून लिहिण्याच्या' चुका अनेकदा उमगून येण्याचा पूर्ण संभव असतो व त्याबद्दल तत्काळ वर्गाबाहेर किंवा परीक्षेच्या मंडपाबाहेर हकालपट्टी व परत परीक्षेसही न बसण्याची भयंकर शिक्षा भोगावी लागते. अगदीं शेवटपर्यंत कोणासही न कळतां तुमची चोरी पचली अशी अशक्य कल्पनाही आपण क्षणभर गृहीत धरूं. पण दुसऱ्याच्या उसन्या दागिन्यांवर श्रीमंत म्हणून मिरविण्यानें जशी एखादी 'ठमाबाई' किंवा 'चिमाबाई' खरी श्रीमंत होत नाहीं, तसेंच 'प्राप्ते परीक्षासमये काचो काचः मणिर्मणिः' किंवा 'वसंतसमये प्राप्ते काकः काकः पिकः पिकः' ह्याप्रमाणें जगांतल्या खऱ्या परीक्षेच्या प्रसंगीं आपलें अज्ञान उघडें होऊन आपलें हसूं मात्र व्यर्थ होईल व त्या फजितीपुढें आपणांस शरमेनें मान खालीं घालावी लागेल. पण त्या वेळीं 'आजवर आपण विद्येचा वृथा डौल केला' म्हणून पश्चात्ताप करीत बसण्यापेक्षां आतांपासूनच सावध राहाणें योग्य.

चोरी करणाराप्रमाणेंच त्याला मदत करणाराही तितकाच गुन्हेगार ठरत असतो.

एखाद्या संस्थेचा नाट्यप्रयोग असला म्हणजे भाषण न येणाऱ्या पात्राला पडद्यांतून तें सांगून तो नाट्यप्रयोग कसाबसा पार पाडावा लागतो. पण तें एक तर सर्व संस्थेचें कार्य असतें. उलट, येथें वैयक्तिक म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याच्या खऱ्या परीक्षेचें कार्य असतें. नाट्यप्रयोगांतसुद्धा भाषणें 'सांगावीं लागणें' हें तरी चांगलें थोडेंच समजलें जातें? तितक्या मानानें त्या त्या 'पात्रा'ला कमीपणाच येत असतो. विद्यासंपादनाचें हें संघटित नाटक नसून ह्या खडतर जगांत पुढें होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बौद्धिक कसोटीची नीट तयारी पारखून पाहाण्याचें हें ठिकाण असतें.

तुम्ही म्हणाल, "काय? आम्ही आपल्या मित्रांना मदत करूं नये? 'गरजेच्या वेळीं जो मदत करतो तोच खरा मित्र होय' 'A friend in need is a friend indeed' असें तुम्हीच आम्हांला आजवर शिकवीत आलांत ना? मग आम्ही वरील प्रकारें मदत करण्यास काय हरकत आहे?" ह्यावर उत्तर इतकेंच कीं, तुम्ही आपल्या मित्रास मदत अवश्य करा, पण ती करण्याचें स्थल

 बौद्धिक कसोटी घेतली जात-असतांनाचा वर्ग किंवा परीक्षेचा मंडप नव्हे. तसेंच मदत

करण्यास योग्य अशी ती वेळही नव्हे ! आपल्या मदतीचें दानसुद्धा इतर दानांप्रमाणेंच भगवंतांनीं गीतेंत सांगितल्याप्रमाणें स्थल, काल व व्यक्ति पाहूनच म्हणजे 'देशे काले च पात्रे च' (योग्य वेळीं, योग्य काळीं व योग्य व्यक्तीसच) केलें पाहिजे. त्यांतल्या त्यांत स्थल व काल मुळींच विसरूं नका. कारण खुद्द वर्गांतसुद्धा गणितें सोडविणें, धडा वाचून दाखविणें, किंवा कविता पाठ म्हणून दाखविणें, इत्यादि रूपानें शिक्षक आपली, तात्पुरती कां होईना, पण एक प्रकारची 'परीक्षा'च पाहात असतात व म्हणूनच त्यासाठीं बरोबर येणारांना मार्कही पुष्कळदा ठेवलेले असतात. अशा परीक्षेंत टिकावें – कसास उतरावें – तेव्हांच पुढल्या तिमाही, सहामाही, वार्षिक वगैरे परीक्षांतून उत्तीर्ण होण्याची आशा असते व पुढें जगाच्या – म्हणजेच व्यवहारांतील बौद्धिक ज्ञानाच्या – कसोटीसही आपण उतरतों, नाहींतर आपली फटफजीति होते. तेव्हां ज्याचे परिणाम इतके दूरवर जाऊन पोचतात त्या कामीं भलत्या वेळीं भलत्या स्थलीं मदत करून आपण आपल्या मित्राची व दानाच्या खोट्या कल्पनेनें आपली स्वतःचीही फसवणूकच करीत नाहीं काय ? वर वर पाहातां योग्य मदत केली व योग्य वेळीं ती घेतली असें वाटून तुम्ही दोघेही आपली 'गोड फसवणूक' करून घेत असतां.

शाळेंतील शिक्षणांत परीक्षा म्हणजे एक बौद्धिक 'चढाओढ' आहे, 'शर्यत' आहे व ती खेळण्यास तुम्हांला खरी खरी खिलाडू वृत्तीची उमेद चढावी म्हणूनच शालागृहाची व त्यांतील वर्गांची योजना आहे. इतर चढाओढींत किंवा शर्यतींत आपण आपल्या मित्रांना मदत करतों काय ? नाहीं ना ? मग तेथें जें कारण तेंच येथेंही आहे. शाबासकी, बक्षीस किंवा वाहवा जी तेथें मिळायची तीच येथेंही मिळते. पण ही गोष्ट लक्षांत न घेतां ह्या दोन्ही गोष्टी वेगळ्या समजण्याची पुष्कळ मुलांची प्रवृत्ति असते व कदाचित् प्रामाणिकपणेंही तीं तसें मानीत असतील. पण तसें मानणें चूक आहे. उपकाराच्या नांवाखालीं अपकारच शेवटीं होतो व त्यामुळें आपण आपल्या मित्राचें अखेर जगाच्या बाजारांत नुकसान करण्यास कारण होतो. तरी तसें अगदीं करूं नका.

कित्येक मुलें भूतदयेनें, स्नेहभावानें व सहानभूतीनें अशा वेळीं आपल्या मित्रांना मदत करीत असतात. त्यांना मनांतल्या मनांत असें वाटत असतें, कीं : शिक्षक

किंवा परीक्षक निर्दय असतात. त्यांच्याकडून अशा वेळीं काय मदत होणार? म्हणून आपणच आपल्या मित्रांना मदत केली पाहिजे – दया दाखविली पाहिजे.' पण ही दया अस्थानीं व अकालीं म्हणूनच चुकीची आहे. मुलांनो, तुमचे शिक्षक किंवा परीक्षकही तुम्हांला वाटतात तितके निर्दय नसतात. त्यांनाही दया असते, सहानुभूति असते व म्हणूनच परीक्षा घेतांना ते शक्य तितकी ती दाखवितातही. पण तुमच्या ठिकाणीं नसलेली दूरदृष्टि त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें वाजवीपेक्षां जास्त आणि उठल्या सुटल्या दया नि सहानभूति ते दाखवीत सुटत नाहींत. कारण 'लायक असेल तोच जगेल, नालायकांचें ह्या जगांत काम नाहीं' हा 'जीवनकलह'चा विशेषतः बौद्धिक जगांतला खडतर नियम त्यांना माहीत असतो. 'लायक' म्हणून 'नालायकां'ची वर्णी लावून, जगाच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा यत्न करणें व जगाची फसवणूक करणें हें महापाप आहे, हें ते जाणत असतात व म्हणूनच दानाप्रमाणेंच दया व सहानुभूतिही 'देशे काले च पात्रे च' अशीच दाखविली पाहिजे हें त्यांस ठाऊक असतें आणि म्हणूनच ह्या गोष्टींचा ते तारतम्यानें उपयोग करीत असतात.

ह्या सर्वांचा अर्थ तुम्ही आपल्या मित्रांना मदत करूं नये असा नाहीं. तुम्ही त्यांना अवश्य मदत करा. वर्ग सुरू होण्यापूर्वीं किंवा परीक्षा सुरू होण्यापूर्वीं मदत केव्हांही घ्यावी किंवा द्यावी. आपणांला वर्गांत झालेला भाग समजला नसला किंवा आपल्या गैरहजेरीमुळें तो बुडाला असला, तर आपल्या पालकांकडून अगर त्या त्या शिक्षकांकडून त्यांना विनंती करून तो समजून घ्यावा. पण त्यांना तसें करण्यास तितका वेळ नसल्यास, अथवा त्यांनीं 'प्रथम वर्गांतील हुशार मुलांना विचारून पाहा, न आल्यास मग सांगेन' असें आश्वासन दिल्यास, आपण आपल्या विद्यार्थी मित्राला त्याच्या घरीं त्याच्या परवानगीनें गांठून अगर शाळा सुरू होण्याच्या आधीं किंवा मधल्या सुट्टींत वगैरे विचारावें. हीच खरी मदत घेण्याची व देण्याची मर्यादा, हाच खरा काळ व हेंच खरें स्थळ.

आतां खुद्द तुमच्या अभ्यासाकडे वळायचें. वरील सर्व चुका टाळून जो अभ्यास वर्गांत होईल तोच खरा खरा अभ्यास होईल व तोच तुमच्या अंतिम कल्याणाला कारण होईल हें उघड आहे. कारण, त्यांत खरें खरें स्वावलंबन आहे व

‘ लुळ्या पांगळ्या व त्याही दिखाऊ श्रीमंती ’ पेक्षां ‘ धट्टी कट्टी गरिबी ’ शतपटीनें बरी हें तुम्हांस ठाऊकच आहे. तर वरीलप्रमाणें आपण वर्गांत वाचन करण्यास (म्हणजे धडा वाचून दाखविण्यास) अगर कविता म्हणण्यास (म्हणजे म्हणून दाखविण्यास) उभे राहिलों असतां इतर मदतीची – मित्रांच्या मदतीची – अपेक्षा नाहीं, हें निश्चित ठरल्यावर खऱ्या कर्तबगार व महत्त्वाकांक्षी मुलाला स्वतःच्या शक्तीवर तें कार्य पार पाडण्याचें स्फुरण चढलें पाहिजे व तसें तें त्यास चढतेंही. इतर लेचींपेचीं मुलें मात्र गळून पडतात. पण त्याला आपण काय करणार ? कारण विद्यादेवीला लेचेपेचे व परावलंबी वीर नको असून खरे छातीचे, तडफेचे व उमेदीचे वीर पाहिजे असतात. ह्याप्रमाणें आपण उभे राहिलों असतां आपलें वाचन अस्खलित येण्यास किंवा कविता बिनचूक येण्यास त्यांचा अभ्यास घरीं नीट केलेला असला पाहिजे. पण तो बरेच जण नीट करीत नाहींत व वर्गांत त्यांचें वाचन अगर कविता म्हणणें बिनचूक येत नाहीं. आतां ह्या कामीं जास्त उपयोगी पडणाऱ्या एक एक सूचना आपण घेऊं व त्यांचा सविस्तर विचार करूं.

प्रथम वाचन घ्या. इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदी, वगैरे कोणत्याही भाषेंतील पुस्तकाचें वाचन वर्गांत करून दाखवायच्या वेळीं (१) बिनचूक, (२) मध्यम वेगानें, (३) योग्य :जागीं थांबून व (४) मध्यम मोठ्यानें, असें वाचलें पाहिजे. (१) मूळचे शब्द गाळणें, (२) पदरचे शब्द घालणें, (३) एकाच वाक्यांत तेच तेच शब्द पुन्हा पुन्हा उच्चारणें, हे दोष टाळले पाहिजेत. (१) चुकत चुकत, भलताच उच्चार करीत वाचणें, (२) पंजाब मेलच्या वेगानें, स्वल्पविराम, अर्धविराम व विशेषतः पूर्णविरामांच्या स्टेशनापाशींही योग्य तितका वेळ न थांबतां, अगदीं भरधाव वाचनाची गाडी सोडणें, (३) योग्य जागीं न थांबतां भलत्याच जागीं थांबणें व (४) मध्यम मोठ्यानें न वाचतां एक्तर फार मोठ्यानें किंवा अगदीं हळू वाचणें हे दोषही टाळले पाहिजेत. इतक्या दोषांचा भुसा आपल्या बुद्धीच्या रंध्यानें पाडल्यावर साफ व गुळगुळीत झालेल्या लाकडावर जसा सुंदर पॉलिशचा हात त्याला शोभा आणण्यास चढवायचा असतो त्याप्रमाणें, किंबहुना, त्याहूनही विशेष जरूर असे आपल्या स्वराचे आरोहावरोह म्हणजे वाचनांतील त्या त्या वाक्याला अनुरूप असा उंच किंवा नीच,– त्याचप्रमाणें त्या

त्या वाक्यांतील भावनेला धरून – आनंद, आश्चर्य, भीति, शोक, उत्सुकता, इत्यादि विकारांना अनुरूप असा – आपला आवाज निघाला तर तें वाचन सर्वांगसुंदर होऊन आपणांस भरपूर मार्क मिळतात. म्हणून आपल्याच दोषास्तव कमी मार्क मिळाले तर रुसून न बसतां आपल्या ठिकाणचे दोष टाळण्याचा आटोकाट यत्न करा – त्यांत सिद्धि मिळवा.

सारांश, पट्टीच्या वक्त्याच्या अंगीं जे गुण असावे लागतात तेच सर्व गुण वर्गांत वाचन करून दाखविणाऱ्या मुलाला दाखवावे लागतात. तुम्ही एखाद्या सभेस गेलां असतां तेथें ऐकलेलीं निरनिराळीं भाषणें आठवा, म्हणजे प्रत्येकाची तऱ्हा निराळी असलेली तुम्हांस आढळून येईल व त्यांतल्या त्यांत ज्या वक्त्याचें भाषण विशेष परिणामकारक झालें तें तसें कां झालें ह्याचा विचार करतां त्याचा आवाज, त्याचा अस्खलित उच्चार, त्याच्या आवाजाचे योग्य चढउतार, त्याचें योग्य जागीं थांबणें, त्याचे योग्य असे हावभाव, हे सगळे आपल्या मनावर परिणाम करण्यास कारण झाले आहेत असेंच तुम्हांला कळून येईल. मग शिक्षकांच्या किंवा परीक्षकांच्या मनावर आपल्या वाचनाचा योग्य तो परिणाम होऊन आपणांस भरपूर मार्क मिळण्यास आपणही वरील वक्त्याचे गुण शक्य तितके आपल्या अंगीं आणावयास नकोत काय ?

आतां कवितेकडे वळूं. जी गोष्ट वाचनाची तीच जवळ जवळ कवितेची आहे. कविता पाठ म्हणून दाखविण्यांत स्वतंत्र अशी एकच गोष्ट सांगावयाची आहे. ती म्हणजे गद्य व पद्य ह्यांतील फरक आपण कविता म्हणतांना लक्षांत ठेविला पाहिजे. प्रत्येकाला जरी ईश्वरदत्त उत्तम गळा नसला, तरी त्यांतल्यात्यांत शिक्षक सांगतील त्याप्रमाणें नीट गळ्यावर आपण कविता म्हटली तरच आपणांस योग्य ते मार्क मिळतील. बिनचूक म्हणण्यानें पासापुरते मार्क मिळाले, तरी जास्त मार्क मिळण्यास आपला गळाच आपणांस ह्या कामीं साहाय्यक होतो. गद्याबरोबर काव्याच्या गोड गुणगुणण्याचीही आवड आपल्या आयुष्यांत उत्पन्न व्हावी व त्यामुळें एरवीं रुक्ष असणाऱ्या आपल्या भावी आयुष्याला एक प्रकारची गोडी येऊन आपलें जीवन आपणांस सुसह्य वाटावें हाच ह्यांतला हेतु असतो. दुधांत साखर, किंवा सोन्याच्या दागिन्याला हिऱ्याचें कोंदण असल्यावर जशी अधिक गोडी व शोभा येते त्याचप्रमाणें

कविता गळ्यावर म्हटल्यानें ती विशेष गोड लागते. ह्यासाठीं तसा प्रयत्न तुम्हीं अवश्य केला पाहिजे. पुष्कळ मुलांचे गळे चांगले असतात, पण ते जाणूनबुजून गळ्यावर म्हणण्याची हेळसांड करतात व आपल्याच नुकसानीला कारणीभूत होतात. सहजासहजीं मिळून जाणारे मार्क केवळ हयगयीमुळें ते बिचारे गमावतात. तरी अशी हयगय करूं नका. बाकीच्या सूचना वाचनाप्रमाणेंच लक्षांत ठेवावयास हव्यात. तुम्ही त्या विसरलात तर नुसत्या तुमच्या गोड गळ्यावर तुम्हांस कितीसे मार्क मिळणार ?

गद्य वा पद्य वर्गांत नीट वठवितां येण्यास सोपा उपाय म्हणजे स्वतः घरीं ह्या कामीं दहापांच वेळां वाचन अगर पाठांतर केल्यावर खुद्द आपल्या घरच्या जास्त शिकलेल्या अशा नातलगास अगर आपल्या विशेष ओळखीच्या मनुष्यास सांगून आपली वाचनाची वा पाठांतराची परीक्षा घेववून आपणांस दहापैकीं मार्क देण्यास सांगावें. त्याप्रमाणें जरूर तशी तयारी घरीं करून मगच वर्गांत यावें. पण अशीं मुलें थोडीं. बहुतेकांना वरील प्रकारचें कांहींना कांहीं साधन असून त्याचा ते योग्य फायदा घेत नाहींत. त्यांनीं वरील सोप्या उपायाचा अवलंब करावा म्हणजे त्यांचें वाचन अगर कविता म्हणणें दिवसेंदिवस सुधारत जाईल व मार्कही जास्त मिळतील. ह्यांशिवाय इतर म्हणजे गणित, इतिहास, भूगोल व शास्त्र ह्या विषयांचें शिक्षण वर्गांत घेतांना भाषाविषयाप्रमाणेंच नीट लक्ष द्यावें. सर्वच विषयांना लक्ष देण्याची आवश्यकता असते. विषय कोणताही असला तरी शिक्षकांच्या बोलण्याकडे व इतर हालचालींकडे जसें आपण दक्षतेनें लक्ष देतों, तसेंच आपण त्यांनीं फळ्यावर लिहिलेलें उतरून घेण्याच्या कामींही दक्ष राहिलें पाहिजे. पुष्कळदा ' लिहून घ्या ' असें शिक्षकांना सांगावें लागतें तसें लागूं नये व तुम्ही नुसते आजीबाईसारखे पुराण ऐकत न बसतां सर्वेन्द्रियांनीं चपळ राहावें.

ह्याप्रमाणें उत्तम अभ्यास करून शिक्षण घेणाऱ्या व न घेणाऱ्या अशा सर्व मुलांपैकीं कित्येकांच्या हातून शाळेच्या अल्पस्वल्प नुकसानीच्या व गैरशिस्तीच्या ज्या चुका वर्गांत शिक्षक नसतांना — म्हणजे मधल्या सुट्टीच्या वेळीं आणि कधीं कधीं तर खुद्द वर्गांत एखाद्या गरीब शिक्षकाच्या देखतही होतात त्यांचा उल्लेख करून मग मी पुढच्या प्रकरणाकडे जाणार आहें.

पहिली चूक शाळेचा खडू कारणावांचून भयंकर नासणें व त्यानें आपलीं बाकें व शिक्षकांचें टेबलही खराब करणें, ही होय. खडूनें लिहून खराब करण्याचीं बाकें व टेबलें हीं ठिकाणें नव्हेत हें काय तुम्हांस कळत नाहीं? खडूला काय किंमत पडत नाहीं? शिवाय तो शिक्षकांच्या अगर मॉनिटरच्या परवानगीवांचून वापरण्याचा आपणांस काय अधिकार? अशी तिहेरी चूक ह्या एकाच चुकींत होत असते. ह्याशिवाय चाकूनें बाकांचीं सालपटें काढण्याचा यत्न करणें, तसेंच बाकांशीं दांडगाई किंवा आदळआपट करून तीं खिळखिळीं करण्याचा यत्न करणें, इत्यादि चुका कित्येकजण करतात. त्याचप्रमाणें काचेचीं तावदानें असलेल्या खिडक्या व दारें ह्यांच्याशींही कित्येकांची दांडगाई चालते. तसेंच वर्गांतील भिंतींवर, फार काय, संडासांतील भिंतींवरसुद्धा, पेन्सिलीनें वाटेल तें लिहून त्या खराब करणें, ही चूकही कित्येक मुलें करीत असतात. शाई व शाईच्या दौती नीट न वापरतां हयगयीनें वापरून शाई सांडणें व त्यानें वर्गाची जमीन व भिंती खराब करणें, वर्गाच्या भिंतीला आपलें ओलें लिखाण टिपणें, तसेंच परीक्षेच्या व इतर वेळीं त्या भिंतींवर अगर जमिनीवर शाईचे तुषार आपल्या लेखणीनें उडवून त्या खराब करणें, ह्याही चुका उल्लेखनीय आहेत. ह्यांशिवाय शिस्तीच्या दृष्टीनें ड्रॉइंग, गायन, ड्रिल, वगैरे कामांसाठीं वर्ग बदलतांना एका रांगेंत न चालणें व रांग तोडून चालणें, हाही बेशिस्तीचा प्रकार दृष्टीस पडतो. हें सर्व वाईट आहे, तरी ह्याचा अवश्य त्याग करा.

गुरुजनांविषयीं योग्य आदरभाव दाखवण्याच्या दृष्टीनेंही अलीकडील विद्यार्थ्यांत बरीच ढिलाई आली आहे. तेव्हां त्या बाबतींतल्या चुकांचाही निर्देश करणें बरें.

त्या चुका म्हणजे नम्रतेचा अभाव व स्वतःला फाजील शाहाणे समजून दुढ्ढाचार्यासारखें वागणें. शिक्षकांच्या पश्चात् त्यांच्या खुर्चीवर बसणें, ते वर्गांत आले तरी लवकर न उठणें, ते शाळेबाहेर भेटल्यास त्यांना नमस्कार न करणें व त्यांच्या गैरहजेरींत त्यांच्यासंबंधीं 'अरे तुरे' ची भाषा वापरणें, ह्या चुका किती वाईट आहेत बरें? विशेषतः शेवटची चूक तर कमालच आहे, व सर्व चुकांना तीच कारण आहे. तेव्हां तिचा त्याग केल्यास इतरही चुका तुमच्या हातून होणार नाहींत. वयानें, ज्ञानानें व योग्यतेनें आपल्यापेक्षां वडील माणसांना एकेरी नांवानें त्यांच्या पश्चात्सुद्धा संबोधूं नये. ह्या चुकीचा अवश्य त्याग करा.

आतां वास्तविक मी तुम्हांस तुमच्या क्रीडांगणावर घेऊन जाण्यास हवें; कारण शाळा सुटल्याची ती पाहा घंटा वाजत आहे, तिचा गजर चालू आहे, आणि तुम्हीही घरीं व नंतर क्रीडांगणावर जाण्यास अगदीं उत्सुक झाला आहांत! पण कांहीं काळ ती तुमची उत्सुकता मला निरुपायानें आवरून धरावी लागणार आहे. कारण एकदा येथून बाहेर पडल्यावर पुन्हा येथें न येतां, आरंभीं संकल्प केल्याप्रमाणें, तुमच्या दिनक्रमाच्या पुढच्या गोष्टी मला सांगाव्या लागणार आहेत. मग शेवटीं सामान्य विवेचन व शाळेच्या अभ्यासाव्यतिरिक्त तुम्हीं कोणकोणत्या गोष्टी विद्यार्थी-दशेंत संपादन कराव्यात हें सांगणार आहें. तर अगोदर आतां तुम्हांला तुमच्या परीक्षेच्या मंडपांत घेऊन जातों. तेथील सर्व व्यवस्था लागली म्हणजे मगच तुमच्याबरोबर क्रीडांगणावर येईन.

प्रकरण सहावें

परीक्षेच्या मंडपांत

परीक्षेच्या तयारीमध्यें ‘परीक्षक’ कोण आहेत त्याची चौकशी कित्येकजण विशेष करीत असतात, पण त्याची आवश्यकता नाहीं. कारण कोणीही परीक्षक झाला तरी तो ‘दोन अन् दोन पांच’ म्हटल्यास थोडेंच बरोबर देणार आहे? मग ह्या वृथा चौकशींत काय अर्थ आहे? त्यापेक्षां आपण आपला अभ्यास व्यवस्थेशीर करून परीक्षा देण्यांस जाणें व ‘परीक्षकां’च्या नांवांच्या चौकशींत वेळ व्यर्थ न दवडणें, हेंच श्रेयस्कर.

परीक्षा, त्यांतल्या त्यांत वार्षिक परीक्षा म्हटली कीं, छाती थोडीशी धडधडतेच व त्या अभ्यासापुढें खाणेंपिणेंसुद्धा धड सुचत नाहीं. पण डोकें जास्त पिकवून न घेतां शांत ठेवूनच आपण परीक्षेच्या मंडपांत प्रवेश केला पाहिजे. नाहींतर सगळाच गोंधळ होऊन जायचा. ह्यासाठीं सबंध वर्षभर आपण व्यवस्थित अभ्यास करीत राहाणें हेंच जास्त योग्य ठरतें व तसें केलें असतांनाच खरी विश्रांति आपणांस मिळूं शकते. आतां इतकेंही करून परीक्षेच्या ऐन दिवसांत थोडीशी तरी छातीची धडधड होणारच; – कारण ‘पेपर कसा येतो नि काय येतो?’ असें आपणांस वाटणें

साहजिकच आहे. चला मुलांनो, ती पाहा दुसरी घंटा झाली. ती तुम्हांला आपापल्या जागीं बसण्यास बोलवीत आहे.

तिसरी घंटा झाल्याबरोबर ती पाहा पेपर वाटण्यास सुरुवात झाली. तरी पेपर लिहिण्यापूर्वी व लिहितांना काय काय गोष्टी लक्षांत ठेवाव्या व त्या कामीं काय चुका होतात तें मी तुम्हांस आतां सांगणार आहें.

पहिली गोष्ट म्हणजे पेपर हातीं पडल्याबरोबर धांदरटपणानें कित्येक मुलें, सर्व पेपर नीट वाचून न पाहातांच, एकदम लिहिण्यास सुरुवात करतात. पण तसें न करतां तुम्ही प्रथम शांतपणें सर्व पेपर नीट वाचून पाहा व त्यांतल्या त्यांत जो सोपा असून जास्त मार्कांचा प्रश्न असेल तो लिहिण्यास आधीं सुरुवात करून मग क्रमाक्रमानें, पण ह्याच रीतीनें इतर प्रश्न सोडवीत जा, म्हणजे ' जास्त प्रश्नाचा व सोपा प्रश्न लिहायचा राहिला ' असा पश्चात्ताप करण्याची पाळी तुमच्यावर येणार नाहीं.

दुसरी गोष्ट म्हणजे मार्कांच्या मानानें उत्तर लहान मोठें द्यायचें असतें. एकाच प्रश्नाच्या उत्तरांत वाजवीपेक्षां जास्त वेळ गमूं नका, नाहींतर तुमचे इतर प्रश्न लिहिण्याचे राहातील, त्यांना पुरेसा वेळ मिळणार नाहीं. ह्या कामीं विशेष उपयोगी पडणारें जें घड्याळ तें मिळणें शक्य असल्यास पूर्ण जबाबदारीनें अवश्य जवळ बाळगा. पण न मिळालें तर मधून मधून सुपरवायझरना विचारण्यास हरकत नाहीं. तासांचे टोले पडत असल्यास उत्तमच.

तिसरी गोष्ट म्हणजे उत्तर मुद्देसूद लिहिणें जरूर आहे. तसेंच मार्कांच्या बेतानें तें लहान किंवा मोठें असावें. साधारणपणें एका मार्कास दोन ओळी हें प्रमाण ठेवण्यास हरकत नाहीं. मुद्देसूदपणा मात्र सर्वत्र सारखाच हवा. पण कित्येक मुलें प्रश्न एक, तर उत्तर भलतेंच, असें करीत सुटतात. त्यामुळें वेळापरी वेळ जाऊन मार्कही नीट मिळत नाहींत. ह्यासाठीं उगाच धांदरटपणानें कांहींतरी लिहिण्यांत अर्थ नाहीं.

ह्यानंतर आपल्या लिहिण्याचा वेगही लक्षांत घेणें जरूर आहे. तो सबंध वर्षांत होईल तितका वाढवून ठेवल्यास अशा वेळीं उपयोगी पडल्याशिवाय राहात नाहीं. अक्षर सुंदर नसलें तरी निदान सुवाच्य व लेखन शुद्ध असलें पाहिजे. विशेषतः भाषाविषयाच्या पेपरमध्यें तर ह्या कामीं जास्तच खबरदारी घेणें जरूर आहे. सुंदर, सुवाच्य, शुद्ध व झरझर लिहितां येणें ही गोष्ट साधेल तितकी वर्षभर साधून ठेवा.

ह्यानंतरची सूचना म्हणजे शेवटचीं दहापंधरा मिनिटें लिहिलेला पेपर वाचून पाहून त्यांत जरूर ती दुरुस्ती करणें, ती नको असली तरी प्रश्नांचे आंकडे नीट लिहिले आहेत किंवा नाहींत, तसेंच पेपरवर आपलें नांव, नंबर, विषय, पोटविषय वगैरे सर्व नीट लिहिलें आहे किंवा नाहीं हें पाहाणें, नसल्यास तें लिहिणें, अगर कमी असेल तें पुरें करणें, तसेंच पुरवण्या असल्यास त्या एकत्र अनुक्रमानें बांधणें, ह्यांकडे खर्च करणें बरें. कित्येक मुलें धांदरटपणानें वरील गोष्टींपैकीं कांहीं ना कांहीं विसरतात, कोणी कोणी तर नांव वगैरे न लिहितांच पेपर देतात, म्हणजे पत्ता न लिहितां पत्र धाडण्यापैकींच प्रकार! ह्यासाठीं अशी चूक होऊं देऊं नका.

आतां शेवटची सूचना म्हणजे नोटसूचीं अगर वहीचीं पानें फाडून आणून यांवरून किंवा दुसऱ्या मुलाच्या पेपरवरून पाहून कॉपी करण्याची कांहीं मुलांना अत्यंत वाईट सवय असते, ती त्यांनीं सोडून देणें अवश्य आहे. कारण हें करणें, तसेंच त्या कामीं दुसऱ्यास मदत करणें ह्या दोन्ही गोष्टी चूक आहेत. ह्यासाठीं अशी कॉपी स्वतः करूं नका किंवा दुसऱ्यास करण्यास मदत करूं नका. मुलांनो, ईश्वराला खोटीं व लांडीलबाडी करणारीं माणसें मुळींच आवडत नाहींत. त्यापेक्षां सरळ व प्रामाणिकपणानें वागणारा पण बुद्धीनें मंद असा शुद्ध दगडही देवाला अधिक प्रिय वाटतो. देवाच्या घरीं ह्या आंतरिक गुणालाच मान आहे, व त्यानेंच त्यास खरा खरा आनंद होतो. तुम्ही किती हुशार आहांत ह्यापेक्षां तुम्ही किती सदाचारी आहांत हेंच तो पाहातो. तेव्हां ही चूक कधींही करूं नका. जी कांहीं हुशारी दाखवायची ती अशा लांड्यालबाड्या करून दाखवूं नका, तर सरळ रीतीनें दाखवा.

आतां तुमचा पेपर लिहून झालेला आहे व इतर सर्व पेपरही ह्याचप्रमाणें संपून जाणार. आतां पेपर तपासून झाल्यावर व ते तुमच्या हातीं आल्यावर म्हणजे परीक्षेचा निकाल लागल्यावर तुम्ही कसें वागावें व काय करावें ह्याचा विचार करून मगच आपण क्रीडांगणावर जाऊं. पेपर तपासून येईपर्यंतच्या काळांत तुम्ही आनंदानें आणि मोकळेपणानें नाचण्या-बागडण्यास उत्सुक झालां असाल नाहीं?

वार्षिक परीक्षेंत नापास होणारीं कांहीं कांहीं भावनाप्रधान मुलें वेड्यासारखीं घरांतून व कांहीं तर कमालीच्या वेडेपणानें ह्या जगांतूनच नाहींशीं होतात! जगांतून

नाहींशा झालेल्या मुलांना माझें हें लिहिणें कितपत उपयोगी पडेल तें दिसतेंच आहे. पण निदान ह्यापुढें तरी कोणी असा वेडेपणा करूं नये. नापास झाल्यावर आपणांस अत्यंत वाईट वाटतें. पण म्हणून काय आपण त्यासाठीं जीव द्यायचा? किती बरें हा वेडेपणा? मुलांनो, मीसुद्धा मॅट्रिकमध्यें पहिल्या वर्षीं नापास झालों होतों. पण म्हणून काय मीं जीव दिला? मीं जर त्या वेळीं जीव दिला असता तर मी जो आज एवढा बी. ए., बी. टी. होऊन तुमच्यासाठीं हें लिहीत आहें तें लिहूं शक्लों असतों का? पण ह्याचा अर्थ मला वाईट वाटलें नाहीं असें नाहीं. फार काय, त्या दु:खाच्या भरांत मीं अन्नसुद्धा एकदोन दिवस धड घेतलें नाहीं. पण हेंसुद्धा योग्य नव्हतेंच. "जें कांहीं रागवायचें तें आपल्या अभ्यासावर रागवा, त्या बिचाऱ्या अन्नावर कां?" अशी माझी थोरल्या बंधूंनीं समजूत घातली. मग मी नेहमीं-प्रमाणें अन्न घेऊं लागलों. पण आत्महत्येचा विचार मात्र माझ्या मनांत कधींच आला नाहीं. तसाच तो तुमच्याही मनांत कधींच येऊं देऊं नका.

नापास झालें तरी हसत सुटा व निगरगट्टाप्रमाणें वागा असाही ह्याचा अर्थ नाहीं. योग्य रीतीनें वाईट वाटून घेऊन आपली चूक पुढल्या वर्षीं सुधारण्याचा दृढनिश्चय करून दुप्पट जोमानें व जणूं काय आपण प्रथमच त्या वर्गांत आलों आहों इतक्या आस्थेवाईकपणानें व वक्तशीरपणानें आपला अभ्यास पुन्हा नीट करून सुयश मिळवा. ह्या शैक्षणिक क्षेत्रांत अनेकदा यत्न करूनही यश न आलें तरी आत्महत्येच्या विचाराचें मुळींच कारण नाहीं. कारण, शिक्षणाशिवाय इतर अनेक क्षेत्रांपैकीं एखाद्या क्षेत्रांत तुम्ही चमकणार नाहीं कशावरून? ह्यासाठीं त्या दृष्टीनें मग यत्न करण्यास व तिकडे विजयी होऊन चमकण्यास कांहींच हरकत नाहीं. अशींही कित्येक उदाहरणें तुम्हीं ऐकलीं असतीलच. ह्यासाठीं कोणत्याही स्थितींत, 'धीर धरा, धीर धरा तकवा। हडबडूं गडबडूं नका ॥' हा समर्थांचा उपदेश किंवा 'धीर धरी रे धीरा पोटीं। असतीं मोठीं फळें गोमटीं ॥" हा कै. केशवसुतांचा उपदेश ध्यानीं घेऊन 'तोडलेला तरु जसा दुप्पट जोमानें वाढतो' किंवा 'आपटलेला चेंडू जसा दुप्पट उशी घेऊन वर उडतो' त्याप्रमाणें आपण दुप्पट उत्साहानें आपल्या कार्यास लागणें हेंच आपलें खरें कर्तव्य आहे.

आतां तपासलेले पेपर मिळाल्यानंतर कसें वागावें? तपासलेले पेपर हातीं पडल्याबरोबर जे मार्क मिळाले ते बरोबर आहेत, आपल्या लायकीप्रमाणेंच ते आपणांस मिळाले आहेत, असें नम्रतेनें व गुरुजनांबद्दल योग्य आदरपूर्वक मानणारीं मुलें फारच थोडीं असतात. बहुतेकांची कुरकुर आणि धुसफुस उघड किंवा मनांत चाल्लेलीच असते. मार्क जे मिळतात ते लेखनाच्या कामीं बाह्यांग म्हणजे कागद, शाई, हस्ताक्षर व शुद्धाशुद्धता आणि अंतरंग म्हणजे मुद्देसूदपणा, भरपूरपणा व शक्य तर सुंदर व उच्च दर्जाची भाषा, ह्यांवर मिळत असतात. इतकीं अनुसंधानें त्यांत पाहावयाचीं असतात. इतक्यांचा विचार एकाच वेळीं करायचा असतो व ह्यांहींकरून जो संकलित परिणाम मनावर होतो, तदनुसार मार्क मिळत असतात. म्हणून मुलांनो, तुम्ही कधींही निष्कारण कुरकुरत राहूं नका व चुकीच्या रागानें आदळआपट करून आपल्या परीक्षकाशीं भांडण्यासही उठूं नका. वरील सर्व गोष्टींचा विचार करूनही तुमच्या अपेक्षेप्रमाणें जास्त मार्क कां मिळाले नाहींत, हें जाणण्याची खरी तीव्र तळमळ वाटत असल्यास ती दाबून ठेवूं नका. मधल्या सुट्टींत शिक्षकांच्या खोलींत त्यांच्या परवानगीनें जाऊन अथवा त्यापेक्षांही उत्तम म्हणजे खुद्द त्यांच्या घरीं ते सांगतील त्या वेळीं जाऊन आपली जिज्ञासा अत्यंत नम्रपणें व 'त्यांनीं केलें आहे तें योग्यच आहे,' अशा विश्वासपूर्वक तृप्त करून घेणें, हेंच अशा कामीं योग्य. पण इतकी तीव्र तळमळ एखाद्याचीच असते व ती सद्गुरु पूर्णही करतात. बाकीच्यांची केवळ क्षणिक व अविचारीपणाची हुल्लड असते व तिलाही तसेंच उत्तर मग शिक्षकाकडून मिळाल्यास त्यांत दोष कोणाचा? ह्यासाठीं असा अविचार तुम्ही कधींही करूं नका. वास्तविक तपासलेले पेपर हातीं पडल्यावर विद्यार्थ्यांचीं कर्तव्यें निराळींच असतात. पण तीं सर्व विसरून ते वरीलप्रमाणें धुसफुस करीत असतात. पण त्यांच्या एवढी साधी गोष्ट लक्षांत येत नाहीं कीं, ज्या हातानें ७०।८०।९० मार्क दिले, त्याच हातानें १५।१०।५ मार्क दिले जातात. अशा वेळीं तुमचीं कर्तव्यें कोणतीं तींच मी आतां तुम्हांस क्रमानें सांगतों.

पहिली गोष्ट म्हणजे मिळालेल्या मार्कांची बेरीज बरोबर झालेली आहे किंवा नाहीं हें पाहणें. ती क्वचित् नजरचुकीनें चुकली असल्यास त्यांत शिक्षकांकडून

 अगर दुसरे परीक्षक असल्यास त्यांच्याकडून दुरुस्ती करून घ्यावी. सगळीकडे

नम्रतेनें वागावें व बोलावें. विशेषतः वडील माणसांशीं वागतांना ही गोष्ट अवश्य लक्षांत ठेवावी म्हणजे आपलें काम लवकर व आनंदानें पार पडतें.

ह्यानंतरची गोष्ट म्हणजे भाषाविषयाच्या पेपरमध्यें आपल्या ज्या शुद्धलेखनाच्या चुका झाल्या असतील त्या कमींत कमी तीन वेळां दुरुस्त करून लिहिणें व त्या शिक्षकांना दाखवून त्यांची सही घेणें ही होय. आपल्या अभ्यासांतील निबंधांच्या वह्यांत अगर इतरही ठिकाणीं जेथें जेथें व ज्या ज्या वेळीं आपले गुरुजी आपणांस अशुद्ध लेखनाची अगर अशुद्ध रचनेची चूक दाखवितील तेथें तेथें व त्या त्या वेळींच ती योग्य रीतीनें दुरुस्त केल्याशिवाय पुढें न जाणें, हें आपलें कर्तव्य आहे. चुकांचे खड्डे आणि खांचखळगे तसेच ठेवल्यास आपण तोंडघशीं पडूं व आपल्या इष्ट स्थळीं आपणांस कधींच पोचतां येणार नाहीं. ह्या कामीं बरींच मुलें दुर्लक्ष किंवा आळस करतात व त्यांना वारंवार ह्याची जागृति द्यावी लागते आणि तरीही कांहीं मुलें शेवटपर्यंत तशीं राहातातच. ह्यासाठीं असा आळस किंवा दुर्लक्ष करूं नका.

शेवटची गोष्ट, वर्गांत तो पेपर आपल्या परीक्षक–शिक्षकांकडून सोडविला जात असतां त्याकडे नीट लक्ष देणें व जरूर तेथें लिहून घेणें ही होय. ह्यांतही कित्येक मुलें आळस किंवा दुर्लक्ष करतात. पण तसें करूं नका. इतकें केलें कीं आपली कर्तव्याची मर्यादा ह्या कामीं संपली. मुलांनो, चला तर आतां खेळण्याला.

प्रकरण सातवें

क्रीडांगणावर व घरीं

मुलांनो, आपण खेळाच्या मैदानावर जाण्यासाठीं निघालों खरे, पण शाळेंतून पाटीदप्तर घेऊन तसेंच का आपण परस्पर जाणार ? शिवाय मधल्या सुट्टींत तुमचें खाणें झालें नसलें तर थोडेंसें खाऊन मगच मैदानावर जाणें योग्य. शिवाय चार पांच तास तुम्ही आपल्या आईच्या दृष्टीआड राहिलेले असल्यामुळें तीही तुमची वाट पाहात असेल. तेव्हां त्या आपल्या परमपूज्य मातेलाही प्रथम आपल्या दर्शनानें आनंद देणें आपलें कर्तव्य नाहीं का ? ह्यासाठीं प्रथम घरीं चला, पाटीदप्तर नीट ठेवून द्या, थोडेंसें खाऊन ताजेतवाने व्हा, आपल्या प्रेमळ मातेला आपल्या सहवासानें थोडा वेळ आनंद द्या व मग तिला विचारून खेळण्यास चला.

तें पाहा आलें मैदान ! आणि तो पाहा तुमच्याचसारख्या मुलांचा तेथें हेलावणारा आनंदसागर ! अहाहा ! किती रम्य आणि सुंदर देखावा दिसत आहे बरें ? वाऱ्याच्या गोड झुळुका वाहात आहेत, अस्ताचलाकडे वळलेल्या सूर्याच्या कोवळ्या उन्हाचीं किरणें सुखदपणें अंगावर खेळत आहेत, हिरवळ पायांखालीं गुदगुल्या करून राहिली आहे आणि आनंदानें बागडणारीं मनोहर बालकें एकंदर देखाव्यांत आपल्या चैतन्यपूर्ण हसण्याखिदळण्यानें अलौकिक भर घालीत आहेत !

मुलांनो, तुम्हीही वरील आनंदांत जाऊन मिसळा व इतरांच्याप्रमाणेंच हसण्या-नाचण्याचा व खेळण्या-बागडण्याचा आनंद मनमुराद लुटा !

मुलांनो, सायंकाळच्या वेळीं मोकळ्या हवेंत खेळणें हें शरीराला अत्यंत हितावह असतें. पण कित्येक मुलें ह्या वेळीं खेळण्याच्या ऐवजीं पुस्तकें वाचीत बसतात अगर कोणी कोणी तर अभ्याससुद्धा करतात. पण हें चूक. ' अभ्यासाच्या वेळीं अभ्यास व खेळण्याच्या वेळीं खेळ ' हाच सुखाचा सुगमोपाय आहे.

खेळ जे खेळायचे त्यांत आपला पैसा परदेशीं जाऊं नये अशी आपण खबरदारी घेतली पाहिजे. आट्यापाट्या, खोखो, हुतुतू, लंगडी, विटीदांडू, शिवाशिवी, इत्यादि अनेक देशी खेळ असे आहेत कीं त्यांना पैसा सहसा पडतच नाहीं व क्वचित् पडलाच तर तो बेताचा असून स्वदेशींच राहातो. तेव्हां असे खेळ खेळण्याकडेच तुम्हीं आपली वृत्ति ठेवल्यास तें स्वदेशालाही फायदेशीर होईल. पण अलीकडे पाहावें तो अगदीं लहान मुलांच्या हातींसुद्धा परदेशी बॅटबॉल असतो. हें पाहून खऱ्या देशभक्ताला वाईट वाटणें साहजिक आहे. ह्यासाठीं होतां होईतों देशी खेळच खेळा, व खेळासाठींसुद्धा परदेशी जाऊं पाहाणाऱ्या पैशाच्या प्रवाहाला होईल तितका अडथळा करा.

आतां खेळांपासून काय काय फायदे होतात ते पाहूं. पहिली गोष्ट म्हणजे खेळांमध्यें आपल्या सर्वांगाला हसतखेळत उत्तम व्यायाम मिळून भूकही उत्तम लागते. त्यामुळें वरील प्रकारचे खेळ दररोज खेळणें अवश्य आहे.

दुसरी गोष्ट ह्या खेळांच्या व्यायामामुळें आनंदप्राप्ति होते व शाळेच्या शिक्षणांत ताटकळलेलें आपलें शरीर, मन व बुद्धि हीं मोकळीं होऊन त्या सर्वांना मोकळ्या हवेंत यथेच्छ खेळण्यापासून तरतरी प्राप्त होऊन तीं आपलीं कामें दुप्पट जोमानें करण्यास तयार होतात.

तिसरी गोष्ट म्हणजे आपल्या संघनायकाची आज्ञा बिनतक्रार माननें, नेमून दिलेलें काम व्यवस्थित करणें, आपल्या प्रतिपक्षावर मात करण्यासाठीं नानाप्रकारें डोकें लढवून युक्तिप्रयुक्तीनें आपला हेतु सिद्धीस नेणें, इत्यादि गोष्टी अगदीं सहज अंगीं येतात व ह्या गुणांचाही भावी काळांत उपयोग होतो. ह्यांशिवाय आपल्या

शरीराची वाढ होण्यासही ह्या खेळांचा उपयोग होतो. असे अनेक फायदे ह्या खेळांपासून असल्यामुळें ते तुम्ही दररोज खेळत जा, त्यांत आळस करूं नका.

मुलांनो, सूर्य अस्ताला गेला व काळोखही पडूं लागला. आपणही आतां आपलें येथील कार्य आटोपून आनंदानें घरीं जाऊं या व पुढील कर्तव्यास लागूं या.

सायंकाळीं घरीं आल्यावर हात, पाय व तोंड स्वच्छ धुवून सायंसंध्या, देवाची धूपारती, वगैरे करून रामरक्षादि स्तोत्रें म्हणत अंगणांत अगर मोकळ्या जागेंत फेऱ्या घालाव्या. मग सकाळप्रमाणेंच ईश्वरार्पणपूर्वक भोजन करावें. ह्यांत जी उदात्तता, पवित्रता नि प्रसन्नता आहे ती घरीं येऊन हातपायसुद्धा न धुतां तसेंच पडून राहाणें किंवा चकाट्या पिटीत बसणें व मग कसेंबसें भोजन उरकणें ह्यांत आहे काय? ' मुळींच नाहीं ' असेंच तुमचें विचारी मन उत्तर देईल. विद्यासाधनार्थ निरनिराळे गुण अंगीं बाणवण्याची एकही संधि आपण वाया घालवितां कामा नये. अशा प्रत्येक संधीच्या योग्य साधनानें आपलें जीवितसाफल्यही होत असतें.

ह्याप्रमाणें भोजन उरकल्यावर जरा वेळ शतपावली करून मग दुसऱ्या दिवशीं लवकर उठण्यासाठीं लवकर निजणें जरूरच आहे. पण तत्पूर्वी सापडणाऱ्या तास अर्ध्या तासाचा वेळ व्यर्थ गप्पा मारण्यांत फारसा न घालवतां दासबोध, भगवद्गीता, रामचरित्र, कृष्णचरित्र, ह्यांसारख्या मनाला उदात्त व उन्नत करणाऱ्या पुस्तकांचें किंवा टिळक-आगरकरांसारख्यांच्या चरित्रांचें वाचन करीत घालवावा. अगदीं झोपेची झापड डोळ्यांवर आल्यावर मगच आईवडिलांना व देवाला वंदन करून थोर विभूतींचे विचार व चित्रें डोळ्यांपुढें आणीत किंवा ईश्वराच्या ध्यानांत गुंग होत झोपीं जावें. ह्यांतच आपल्या उदात्त दैनिक कार्यक्रमाचा उदात्त शेवट आहे. प्रातरुत्थानानें व ईश्वरनामस्मरणपूर्वक जसा तुम्हीं आपला दिनक्रम प्रारंभिला तसाच त्या दिनक्रमाचा शेवटही तुम्ही उदात्त रीतीनें करा.

प्रकरण आठवें

इतर गोष्टी

मुलांनो, उठा, पहाट झाली. एका संपूर्ण दिवसाचा दिनक्रम मीं तुम्हांला सांगितला. त्यामुळें वास्तविक मी तुमचा मागल्या प्रकरणाच्या शेवटींच निरोप घ्यायचा! पण अभ्यासाव्यतिरिक्त इतरही कित्येक महत्त्वाच्या गोष्टी आपल्या विद्यार्थीदशेंत करावयाच्या असतात. त्यांच्याबद्दल तुमच्या 'दिनक्रमा'चें वर्णन चालू असतां मला बोलतां आलें नाहीं म्हणून ह्या शेवटच्या प्रकरणांत त्यांबद्दल चार शब्द सांगून मगच मी तुमचा निरोप घेणार आहें.

आधीं मला तुम्हा मुलांपैकीं कित्येक मुलांकडून आचरिल्या जाणाऱ्या एका अनिष्ट प्रथेचा कडकडून निषेध करावयाचा आहे. ती प्रथा म्हणजे वस्तु चोरण्याची होय. पैशा दोन पैशांच्या रबर-पेन्सिलीपासूनसुद्धा ही चोरीची बुद्धि विद्यामंदिरासारख्या पवित्र ठिकाणीं व्हावी ही लांच्छनास्पद गोष्ट आहे! त्याच विद्यामंदिरांत सत्यानें वागणारींही मुलें असतात व त्यांना सापडलेल्या लहानमोठ्या किंमतीच्या वस्तु तीं आपण होऊन शिक्षकाकडे अगर मुख्याध्यापकाकडे आणून देतात ही अत्यंत कौतुकास्पद गोष्ट आहे. जेथें अशा गुणांनीं नटलेलीं एकजात सर्व मुलें असावीं अशी अपेक्षा असते, तेथें विद्यादेवीचे गोड पाठ ऐकतां ऐकतां त्यांकडे

'पाठ करून' मोठ्या शिताफीनें चोऱ्या करणारींही कित्येक मुलें निघावीं ना? शालेय शिक्षणानें मनुष्याच्या मनांतील मूळचा सुष्टदुष्ट अंकुर वाढीस लागतो पण मूळच्या दुष्ट अंकुराला समूळ जाळून टाकण्याचें सामर्थ्य त्यांत नसून तें शील-शिक्षणाच्या व शीलसुधारणुकीच्या विशिष्ट प्रयत्नांत आहे. शिक्षणानें आपल्या दुष्ट हेतूची लपवाछपवी कशी करावी किंवा त्यावर सुंदर कल्पनांची झिलई कशी द्यावी हें जास्त समजून मण्यानें शोभलेल्या एखाद्या सर्पाप्रमाणेंच तो 'सफेत डाकू' तयार होतो. अशा विद्याविभूषित दुर्जनापासून, 'दुर्जनं प्रथमं वंदे' ह्या वचनानुसार आपण पूर्ण सावध राहावें, हेंच योग्य. मुलांनो, अशा 'दुर्जन' मुलावर करडी नजर ठेवून त्यास फजित करा व जरूर तर शिक्षकाकडून दंडही करवा.

आतां आपण आपल्या दैनंदिन कार्यक्रमांत सवड सापडेल तेव्हां अभ्यासाशिवाय, विद्यार्थीदशेला शोभा आणणाऱ्या व भावी आयुष्याला उपयोगी पडणाऱ्या इतर काय काय गोष्टी कराव्यात, तिकडे वळूं.

पहिली गोष्ट प्रवासाची. पाश्चात्य देशांत तर प्रवासाशिवाय शिक्षण पूर्ण झालें असें समजतच नाहींत. आपल्याइकडेही तीर्थयात्रादि करून मगच त्या शिक्षण संपविलेल्या स्नातकानें गृहस्थाश्रमाचा स्वीकार करण्याची एके काळीं पद्धत होती. बहुतेक मुलांच्या मनांत ही प्रवासाची हौस असते. ती तशीच वाढीस लावून ऐतिहासिक, पौराणिक, निसर्गरम्य व भव्योदात्त अशा स्थळांचें दर्शन तुम्ही अवश्य घ्या, म्हणजे करमणुकीबरोबरच तुम्हांस व्यापक ज्ञान होऊन तुमची अंतर्दृष्टिही विशाल होईल व कूपमंडूक वृत्ति नाहींशी होईल. कित्येक मुलांना 'घरकोंबड्या'-सारखें नेहमीं घरींच राहाण्यास आवडतें. पण प्रवासाचीं साधनें सुलभ व सोयीस्कर झालेल्या हल्लींच्या काळांत हें मुळींच योग्य नव्हे. तुमच्यापैकीं कित्येक गरीब मुलांना पैशाच्या अभावीं दूरदूरचे प्रवास करतां येणार नाहींत, पण त्यांनीं अल्पखर्चाचे किंवा मुळींच खर्च न पडणारे असे जवळपासचे प्रवास तरी केल्यावांचून राहूं नये. इतर दूरच्या प्रवासाची कल्पना येण्यास तो करून आलेल्यांनीं लिहिलेलीं त्या स्थलांचीं 'प्रवासवर्णनें' वाचण्याची किंवा ऐकण्याची आवड ठेवावी, म्हणजे झालें.

दुसरी गोष्ट म्हणजे आपणांस रविवार व इतर सुट्टीचे दिवस सापडतात त्या दिवशीं केवळ झोप, गप्पा नि पत्ते ह्यांसारख्या व्यवसायांत वेळ फुकट घालवूं नये.

व्यापक ज्ञानाचें सुलभ साधन जें अवांतर वाचन तें अवश्य करीत जावें. त्यांतही केवळ मनोरंजक गोष्टीच न वाचतां थोरामोठ्यांचीं चारित्रें, रामायण-महाभारतांतील कथा, बोधप्रद निबंध, इत्यादि वाचण्याची आवड ठेवावी. कारण त्यापासून आपणही आपलें आयुष्य उदात्त रीतीनें घालवावें व भावी आयुष्यांत आपल्या देशाच्या, धर्माच्या व समाजाच्या उद्धाराला हातभार लावावा, असा सत्संकल्प आपल्या मनांत अखंड हेलावत राहातो.

तिसरी गोष्ट पाठांतराची. ‘ उदंड असावें पाठांतर ’ असें समर्थ सांगतात त्यांत फार खोल अर्थ आहे. ह्या पाठांतरापासून आपणांस अनेक फायदे होतात. आपल्या वाणीला सुसंस्कार ह्या पाठांतरानेंच मिळतो, मनाला उदात्तता येते व विश्रांतीच्या वेळीं त्यांतील सुंदर वचनें गुणगुणत राहिल्यानें उच्च कर्तव्याची जाणीव उत्पन्न होते. त्याचप्रमाणें विविध दिव्य भावनांच्या लाटाही आपल्या हृदयावर उठून त्याला पवित्र करतात. तिसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे निबंध लिहितांना, छोटेंसें व्याख्यान देतांना, किंवा आपल्यापेक्षां लहान मुलांना उपदेश करतांना ह्या पाठांतरांतील वचनांची गोड पखरण केल्यास आपल्या विवेचनाला विशेष बहर येतो. म्हणूनच ‘ कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करूनिया ’ असें तुकोबांनीं म्हटलें आहे. पण अलीकडे ही पाठांतरची प्रवृत्ति फार कमी झाल्याचें दिसून येतें. ती इतकी कीं, लागोपाठ श्लोकामागें श्लोक अशा दोनदोनशें ओळी म्हणणें तर दूरच, पण कित्येक मुलांना एक श्लोकसुद्धा पुरा म्हणतां येत नाहीं. प्रत्येक ओळीचीं आद्याक्षरें त्यांना सांगावीं लागतात. ह्यासाठीं केवळ शाळेतल्या पुस्तकांतलींच नव्हे, तर इतरही पुस्तकांतलीं इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदी, वगैरे भाषांतील सुभाषितें व सुबोध वचनें जितकीं पाठ करवतील तितकीं करा.

चौथी गोष्ट शाळेच्या वादविवादक सभेंतून भाग घेण्याची. तो तुम्ही अवश्य घ्या. केवळ श्रोते म्हणून नव्हे, तर वक्ते व उपवक्ते म्हणून. प्रथमप्रथम भीति वाटेल, हातपाय लटलट कांपतील, शब्दोच्चारही मुखांतून धड होणार नाहीं, पण भीति मारण्यासाठींच वरील यत्न करावयाचा आहे. पाण्यांत पोहण्यापूर्वी इतरांचें गोड पोहणें पाहून आपणांसही पोहण्याची इच्छा होते, पण प्रत्यक्ष पाण्यांत शिरतांना, किंबहुना, त्याच्या नुसत्या कल्पनेनेंसुद्धा भीति वाटते व हातपाय लटपटतात. पण

‘ पाण्यांत पडल्याशिवाय पोहतां येत नाहीं ! ’ हें जितकें प्रत्यक्ष पोहण्याच्या बाबतींत खरें आहे तितकेंच ‘ वादविवादक सभे ’ मध्यें भाषण करण्याच्या बाबतींत खरें आहे. पाण्यांत पडल्यावर प्रथम नाकातोंडांत पाणी जातें, एखादी डुबी मिळते किंवा घ्यावी लागते व जीव क्षणभर घाबरा होतो, पण ह्या वेळींच नेट धरावा लागतो. एकदा पाण्याची भीति मेली कीं त्वकरच पुढचा सुखद प्रवास सुरू होतो. दोन्हीकडे लीलेनें हातपाय हलवणें, नाना प्रकारच्या बुड्या, उड्या व विविध आसनें हीं साधतात, आणि पट्टीचे पोहणारे म्हणून ख्याति होते. फक्त आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठाच हवी. पण तितकें न साधलें तरी, आपल्या विचारांची नीट जुळवाजुळव करतां येणें, जरूर त्या अन्य वाचनाचा उपयोग करतां येणें व जुळविलेले विचार सभाधीटपणें पुढें मांडतां येणें, हे फायदे कांहीं लहानसहान नाहींत. आतां पोहण्यास शिकतांना ज्याप्रमाणें भोपळा, बिंडा (पांगेऱ्याची लाकडें), दोरी, इत्यादि साधनांचा उपयोग करीत जसें आपण शिकतों तसें इथेंही भाषण लिहून नेऊन वाचणें, मग तें पाठ करून म्हणणें, मग मुद्दे टांचून घेऊन बोलणें व शेवटीं तर सर्व मुद्द्यांची जंत्री मनांतच ठेवून एक एक मुद्द्याचें उद्धाटन करीत बोलणें, अशा टप्प्याटप्प्यानें आपणांस जातां येईल. पोहण्यास शिकतांना जसें दुसऱ्याचें जरूर तें साहाय्य आपण घेतों तसें येथेंही मित्रांचें व शिक्षकांचें घेतां येईल. पण शेवटीं आपलें आपण व तेंही मोकळें पोहायचें आहे आणि स्वतःचाच नव्हे, तर दुसऱ्या बुडत्या बांधवांचाही जीव प्रसंगीं वांचवायचा आहे. त्याचप्रमाणें अज्ञान व अशिक्षितपणामध्यें बुडत असलेल्या आपल्या हजारो, लाखो देशबांधवांना त्यांतून वर काढण्यास आपली वक्तृत्वकलाच कारण होणार आहे, हें विसरूं नका व आतांपासूनच त्याच्या तयारीस लागा.

पांचवी गोष्ट कथाकीर्तनांची. वास्तविक तबलापेटीच्या मधुर साथीवर पदांच्या गोड मेजवानीसह मिळणारें हें आपल्या धर्माचें व संस्कृतीचें उत्कृष्ट ज्ञान फुकट दवडून त्याऐवजीं कांहीं तरी गप्पाटप्पा मारीत बसणें किंवा लोळत पडणें हें योग्य का ? राम, कृष्ण, प्रल्हाद, ध्रुव, चिलया, हनुमान्, सीता, सावित्री, इत्यादि किती तरी पुण्यपावन पौराणिक पुरुषांचीं व स्त्रियांचीं आदर्श चरित्रें, त्याचप्रमाणें अलीकडील

 ‘ राष्ट्रीय कीर्तनकारां ’ कडून ऐकावयास मिळणाऱ्या शिवाजी, तानाजी, झांशीची

लक्ष्मीबाई, इत्यादि थोर विभूतींच्या कथा आपण ऐकावयास नकोत काय? 'आम्हांस त्या घरीं वाचावयास मिळतात' असें म्हणून कसें बरें भागेल? मुलांनो, कोणतीही गोष्ट मनावर ठसण्यास ती जितक्या प्रकारें आपणांस करतां येईल तितकें जास्त परिणामकारक होईल, व तितक्या मार्गांनीं उदात्त गोष्टी आपल्या मनावर आपण ठसवून घेतल्या तरच त्या परिणामकारक होतात.

अरे हें पाहिलेंचि पाहावें। वाचिलेंचि वाचावें।
ऐकिलेंचि ऐकावें। पुनः पुन्हा ॥

हें रामदासस्वामींचें बिनमोल वचन तुम्ही सदैव ध्यानांत ठेवा व त्याप्रमाणें वागा. वाचन, श्रवण, मनन, अवलोकन ह्यांचा अवलंब केला तरच आपल्या देशाच्या, धर्माच्या व संस्कृतीच्या गोष्टी आपल्या मनावर पूर्ण ठसणार आहेत. शिवाजी, तानाजी, झांशीची लक्ष्मीबाई ह्यांपैकीं किंवा दुसरी कोणतीही पौराणिक वा ऐतिहासिक थोर व्यक्ति घ्या. त्या व्यक्तीच्या थोरपणाचा ठसा तिच्यासंबंधीं असलेलीं चरित्रें, नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी व गाणीं, पोवाडे, वगैरे वाचून व ऐकून, त्याचप्रमाणें त्यांचीं तीं तीं स्थळें शक्यतर पाहून व त्यांच्या छायाचित्रांचें दर्शन घेऊनच आपल्या मनावर पुरेपूर ठसणार आहे. ह्यासाठीं त्यांपैकीं साधतील त्या मार्गांनीं तें कार्य साधा व त्या रूपानें आपली मनोवृत्ति करून घेऊन त्या थोर व्यक्तींप्रमाणेंच आपल्या देश – धर्म – संस्कृतीच्या कार्यासाठीं प्रसंगीं प्राण पणाला लावण्याची सिद्धता करून ठेवा. कथाकीर्तनास जाणें हा त्यांतलाच एक मार्ग आहे. त्याची हयगय करूं नका.

सहावी गोष्ट गायनकला, चित्रकला, नाट्यकला, इत्यादि कला आणि धनुर्विद्या, मल्लविद्या, इत्यादि विद्या ह्यांची. ह्यांचा आपल्या भावी आयुष्यांत उपयोग होण्याचा संभव असतो. तरी 'चौदा विद्या आणि चौसष्ट कला' हें वचन लक्षांत ठेवून त्यांपैकीं आपल्या भावी आयुष्यांत कोणती उपयोगी पडेल ह्याचा अंदाज आधींच घेऊन ती ती विद्या व कला ह्या वेळींच साध्य करून घ्या. कारण ह्याच वयांत कोणतीही विद्या किंवा कला उत्तम रीतीनें साध्य होत असते. शाळेच्या संमेलना-सारख्या प्रसंगीं त्यांत उत्साहानें भाग घेऊन ती ती विद्या अगर कला शक्य तितकी

प्रकट करून दाखवा. पुष्कळ मुलांच्या अंगीं नाना तऱ्हेच्या विद्या व कला साधण्याच्या हुषारीचीं बीजें असतात. पण घरच्या मंडळींच्या अडथळ्यानें किंवा खुद्द त्या मुलांच्या आळसानें तीं बीजें अंकुरित होत नाहींत. ह्यासाठीं ह्या बाबतींत तुम्ही योग्य तो प्रयत्न वेळींच करा.

सातवी गोष्ट ईश्वरनामस्मरणाची. देवाचें नामस्मरण करण्यास आपणांस किती तरी वेळ अगदीं सहज सापडूं शकतो. समर्थ म्हणतात :

त्रास, भय, उद्वेग, चिंता। अथवा आनंदरूप असता।
नामस्मरणेंवीण सर्वथा। राहोंचि नये॥

ईश्वर हा सर्वज्ञ व सर्वसमर्थ आहे. त्याचें नाम घेऊन त्याचे गुण आपल्या अंगीं शक्य तितके आणण्याचा यत्न केला, तरच तें नाम घेण्याचें सार्थक. प्रत्येक प्रयत्नाच्या प्रारंभीं ' मामनुस्मर युध्यच ' ह्या श्रीभगवंताच्या आदेशानुसार त्याचें नामस्मरण आपण करीत गेलों, तरच आपल्या आयुष्याला उन्नति प्राप्त होणार आहे.

हें जग किती तरी अडचणींनीं व अडथळ्यांनीं भरलेलें आहे! हिंवाळ्यांत थंडीची हुडहुडी, पावसाळ्यांत पावसाची टिप् टिप् आणि उन्हाळ्यांत उकाड्याची हाश्शहुश्श्, ह्या तीन काळांच्या तीन तऱ्हा आहेत, मग खुद्द आपल्या जीविताची स्थिति काय? आयुष्य साधारणतः पूर्ण धरलें तरी सामान्यपणें १०० वर्षे, पण त्यांतलें जवळ जवळ अर्धे झोपेनें खाऊन टाकलेलें! ह्याशिवाय बालपणचें अज्ञान आणि म्हातारपणच्या नाना आधीव्याधी व गलितगात्रपणा हीं वजा टाकतां किती अल्प आयुष्य उरतें बरें? ह्याशिवाय खुद्द देहाचीं, मनाचीं व बुद्धीचीं व्यंगें कित्येकांना बालपणापासून जडलेलीं असतात. डांस, ढेकूण, चिलटें, माशा, उंदीर, ह्यांसारख्या कृमिकीटकांचा त्रास असतोच! आप्तेष्ट, सगेसोयरे, आला-गेला, पैपाहुणा हे आहेतच! दारिद्र्याचा व आळसाचा अडथळा तर मोठाच! अशा तऱ्हेनें आपलें आयुष्य अनेक अडथळ्यांनीं भरलेलें आहे! त्यांतूनच आपणांस मार्ग काढून आपला विद्याभ्यास व नंतर प्रपंच-परमार्थ साधायचा आहे. आजवर ज्या थोर विभूति होऊन गेल्या त्यांना अडचणी नव्हत्या व आपणालाच तेवढ्या आहेत असें थोडेंच आहे? ह्या अडचणी सार्वत्रिक आहेत. ' जगीं सर्व सुखी असा

कोण आहे ? ' हें खरें आहे. ' सुख पहातां जवापाडें, दुःख पर्वताएवढें ! ' पण त्यांतूनही त्या थोर पुरुषांनीं मार्ग काढला, हीच त्यांची शहामत ! आपणही तसेंच वागत गेलों तरच आपला पुरुषार्थ !

कणशः क्षणशश्चैव विद्यामर्थंच साधयेत् ।

हें सूत्रवाक्य त्या थोरांनीं आपल्यापुढें ठेवलें, म्हणूनच ते थोर झाले. तसेंच आपणही ठेवलें पाहिजे.

आतां ह्यांत कष्ट आहेत, त्रास आहे, दुःख आहे. पण कोणत्याही सात्त्विक सुखाचा मार्ग अशा कष्टांतूनच जात असतो. समर्थ म्हणतात,

आधीं कष्टाचें दुःख सोशिती । ते पुढें सुखाचें फळ पावती ।
आधीं आळसें सुखावती । त्यांसि पुढें दुःख ॥

' प्रगति ', ' पुढें जाणें ' ' कालच्यापेक्षां आज थोडें तरी पुढें जाणें ' हेंच आयुष्याचें ध्येय होऊं शकतें. ही प्रगति कशांत करायची ? अज्ञान, आळस, निद्रा, चुका ह्या कमी करण्यांत करायची. अज्ञान, आळस, चुका ह्या अजिबात जिंकण्याचें ध्येय ठेवून आहार, निद्रा, इत्यादि गोष्टी अगदीं जरूर तेवढ्याच करण्याचें ध्येय ठेवणें हीच खरी ' प्रगति ' व हेंच खरें खरें मानवी आयुष्याचें ध्येय !!

शरीरानें थोर आपण सर्वच होतों, पण मनानें, बुद्धीनें व आत्म्यानें थोर झालें पाहिजे. केवळ पत्रांतील मायन्यांतच ' चिरंजीव ' म्हणवून न घेतां खरें ' चिरंजीवपद ' गांठावयाचें असल्यास, म्हणजे ' मरावें परी कीर्तिरूपें उरावें " हें समर्थवचन खरें करून दाखवायचें असल्यास, आपला देह चंदनाप्रमाणें झिजविला पाहिजे.

झिजल्यावांचून कीर्ति कैंची । मान्यता नव्हे कीं फुकाची ।
जिकडे तिकडे होते चीची । अवलक्षणें ॥

असें समर्थच आपणांस सांगत आहेत. खुद्द ते किती झिजले, आमरण आपल्या देशासाठीं, धर्मासाठीं त्यांनीं स्वतःच्या संसारावरसुद्धा लाथ मारून किती भव्योदात्त कार्य केलें, तें तुम्ही जाणतच आहां. त्यांचा ' दासबोध ' त्यांच्या कार्याची वाङ्मयसाक्ष देण्यास सदैव सज्जच आहे. तेव्हां त्या ' दासबोधा ' चें, निदान त्यांतील निवडक वेच्यांचें वाचन व त्यांच्या ' मनाच्या श्लोकां ' चें नित्य पठन करून,

त्यांच्याप्रमाणेंच तुम्हीही खरेखरे कार्यकर्ते व्हा व आपल्या देशाच्या, धर्माच्या व संस्कृतीच्या उद्धाराला आपल्याकडून होईल तितका हातभार लावण्यासाठीं आपली विद्यार्थीदशा आदर्श विद्यार्थ्यांची बनवा, हेंच माझें तुम्हांला येथें अखेरचें सांगणें आहे. त्या कामीं प्रस्तुत पुस्तिका तुम्हांस थोडी तरी उपयोगी पडो व त्याप्रमाणें तुमच्या हातून वर्तन घडो व तसें घडण्याची बुद्धि तो सर्वजगच्चालक परमात्मा तुम्हांस देवो अशी त्या दीनदयाळ परमेश्वराची प्रार्थना करून व त्याच्याच कृपेनें तयार झालेली ही पुस्तिका त्याच्याच चरणीं अर्पण करून मी तुमची रजा घेतों.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ शुभं भवतु ॥

अनुक्रम
विभाग
क्र.
नों. दि.

म. अ. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...
नों. दि ...
वि. ... क्र. ...

BVBK-0404537